

तो जमाना
आठवला की
असं वाटायचं
तनुजा एक
हिंदी पडद्यावरचं
' हॅपनिंग '
आहे.

साप्ताहिक

# माणूस

शनिवार
६ जुलै १९७४
एक रुपया


चार सॉक्स त्यानी चोरून आम्हाला काळे फासले. एखादा पूल खाणे, साखर प्रकल्प गडप करणे, परमीटवर द्रव्य उकळणे अशी स्तुत्य कामगिरी केली असती तर संतोषच झाला असता!
भारताने अणुबॉम्ब बनवत बसण्यापेक्षा शांततेसाठी वृत्तपत्रीय कागद बनवावा!



इंग्लंडात रबराची जाम टंचाई आढळली. मग काय? आम्ही रबराचा पुरवठा करून मोकळे झालो! ह्यॅऽऽ ह्यॅऽऽ


बांगलाला
मदत केलीत
छान झाले...
... भूतानला
मदतीचा हात दिलात
खूष झालो
आम्ही...
सिक्किमकरांच्या
रक्षणासाठी धाव
घेणार..अफलातून
गोष्ट आहे...
... अन् आज तर
कच्छतिवू बेट
श्रीलंकेला
बहाल केलेत
वा! वा!!!
... नाकेल्या बाई
घरच्या गरीबाला
वाईच
भाकरी
वाढा
हो!
!
माझं साठे
आडनाव
बदलायचय
ताबडतोब!
साठेबाजांची
धरपकड
होणार
आहे
ना
?
फ्रेंच
अणुचाचणीमुळे
'फ्रेंच
फ्लू'
होण्याचा
संभव असतो..
...चीनच्या
अणुचाचणीमुळे
'यलो फीवर'
होण्याचे
भय
असते...
... तथापि
भारताच्या
अणुचाचणीमुळे
या पेक्षा
दुसरे
तिसरे
काय
होणार?

# मुक्काम मुंबई

भारतकुमार राऊत

## फेरीवाले हटाव मोहीम



एकंदरीत आपल्याला ' मोहीम ' या प्रकाराबद्दल भलतंच प्रेम. शाळेची वर्ग स्वच्छता मोहीम असो नाहीतर राज्यपाल पत्नींची ' कीप सिटी क्लीन ' मुव्हमेंट असो. आम्ही मुंबईकर प्रत्येक मोहिमेचं स्वागतच करतो. या मोहिमा प्रेमाला आमचे अर्ध्या चड्डीतले पोलीस खातं सुद्धा अपवाद नाही. हे खातं सुद्धा वारंवार काही ना काही मोहिमा उघडीत असतं आणि विशेष म्हणणे त्या बिनबोभाट बंदही होत असतात. आणि तरीही नव्या नव्या मोहिमा उघडण्याचं सत्र पोलीसखातं वेळ मिळेल तसं चालूच ठेवते.

त्याचं काय झालं की, गेला महिनाभर शहरात कुठंही दंगली नाहीत. राज्य सरकारी कर्मचारी सोडले तर बाकी कुणालाही आपल्या न्याय्य मागण्यांची वगैरे स्फूर्ती आलेली नाही, त्यामुळे फारसे मोर्चे वगैरे नाहीत. संयुक्त अरब अमिरतचे उपाध्यक्ष, श्रीलंकेचे माहिती आणि नभोवाणी मंत्री वगैरे सारखे किडूक मिडूक परदेशी पाहुणे सोडले तर बाकी कुणी बडयापैकी मंडळी शहरात नाहीत. पंतप्रधानबाई आणि त्यांचे तमाम सहकारी सध्या दिल्लीतच दुलईमध्ये गुरफटून थंडीची लज्जत घेताहेत. गेल्या महिना पंधरवडयात शहराच्या आसपास कुठेही मोठा अपघात झालेला नाही. एकूण काय तर गेल्या काही दिवसात मुंबईच्या पोलीस खात्याला फारसं काम नाही. मग काम नाही तर गप्प बसावं; पण आराम हराम है हे पंडितजींनी बजावलंय ना! ते विसरावं? पोलीस खात्यातल्या समस्त अर्ध्या चड्डया आणि खाकी युनिफॉर्म विचारात पडले. फारसा विचार करावाच लागला नाही. कारण मोहिमा उघडण्याची आपली मोनोपोली आहे. तर मोहीम उघडली गेली आणि एका रात्रीत फोर्टमधले रस्ते साफ झाले.

बोरीबंदर ते हुतात्मा चौक हा रस्ता म्हणजे मुंबईच्या तमाम फेरीवाल्याचं माहेरघर. तसंच जगातल्या यच्चयावत वस्तूंची किरकोळ बाजारपेठ. कडक उन्हाळा असो नाहीतर मुसळधार पाऊस, या रस्त्याच्या दोन्ही फूटपाथवर या फेरीवाल्यांचं आसन आणि धंदा व्यवस्थित चालूच. फूटपाथ हा लोकांना चालण्याकरता असतो अशी माझीही प्रामाणिक समज या रस्त्याच्या फुटपाथवर गैरसमज ठरली. तर असो. ऑलिंपिकमध्ये अडथळ्याची स्पर्धा असते ना! ती जर तिथं खास खर्च करून बांधलेल्या स्टेडियममध्ये घेण्याच्या ऐवजी या रस्त्यावर घेतली तर ती अधिक नॅचरल आणि कठीण बनेल असा माझा दृढविश्वास आहे. शिवाय यातून दुसरा फायदा असा की रोज पाच सत्तावनची कल्याण फास्ट पकडण्याकरता हा अडथळ्याचा सागर पार करणारे सचिवालयीन कर्मचारी ही स्पर्धा हा हा म्हणता जिंकतील, असो.

तर एका शुभ प्रभाती सचिवालयाकडे मार्गक्रमण करणाऱ्या कर्मचाऱ्यांना असं स्ट्राईक झालं की, आज आपल्याला चक्क फूटपाथवरून चालायला मिळतंय. सरकारनं मागे अचानक वेतनवाढ जाहीर केली, तेव्हा सुद्धा बसला नव्हता इतका प्रचंड आश्चर्याचा धक्का त्यांना जाणवला. त्यांनी इथं तिथं पाहिलं तर फुटपाथ चक्क मोकळे. च्यायला आहे काय लफडं? फेरीवाले मंडळी कुठाहेत? कुठं काय दंगल बिंगल झाली की काय? की शिवसेनेचा मोर्चा येणार आहे? पण यापैकी काहीच नव्हतं. पोलिसांनी फेरीविरोधी मोहीम उघडून एका रात्रीत या रस्त्यावरच्या सर्व फेरीवाल्यांचा माल आणि त्यांची खोकी, स्टँडस् जप्त केले होते.

तेरडयाचा रंग तीन दिवस याच चालीवर पोलिसांचा दम चार दिवस अशी नवी म्हण हल्ली रूढ झाल्येय. पण चार दिवस उलटून गेले आणि आता पंधरवडा होत

आला तरी या फेरीवाल्यांचं पुनरागमन झालेल नाही. तेव्हा म्हटल हा मामला जरा वेगळा, थोडा सिरियस दिसतोय. शिवाय रोज वृत्तपत्रात बातम्या झळकतच आहेत. आज कुलाब्यातल्या फेरीवाल्याना हुसकावले. मलबार हिलवरचे फेरीवाले गायब. उद्या पोलिस दादरच्या फेरीवाल्यावर धाड घालणार' वगैरे वगैरे, म्हणून म्हटल थोडी चौकशी करावी.

कोणत्याही विषयाची सुरुवात करताना प्रथम त्याची व्याख्या करायची असं इयत्ता सातवीत शिकल्याच मला आठवतं. तुम्हालाही आठवत असेल. अशा तऱ्हेनं प्रथम व्याख्या केल्यान म्हणे विषय समजायला सोपा जातो. सहाजिकच मी सुद्धा फेरीवाले या शब्दाची व्याख्या करायला लागलो. पण 'अर्थशास्त्र' या शब्दाची व्याख्या जशी प्रत्येक अर्थशास्त्रज्ञान वेगळी करून ठेवल्येय तसच 'फेरीवाला' या शब्दाची व्याख्या सरकारी शब्द कोशात एक तर पोलिसांच्या मते आणखी वेगळी. युनियनच्या तज्ञ मंडळीनी तर फेरीवाला या शब्दाचा भलताच अर्थ शोधून काढलेला. या वेगवेगळ्या व्याख्या ऐकून, वाचून धन्य झाल्यानतर 'स्वत च दुकान नसताना रस्ते, फुटपाथ या सारख्या सार्वजनिक ठिकाणी आपल्या मालाची विक्री करतो तो फेरीवाला' अशी एक माझ्या सामान्य बुद्धीला पटेल आणि पचेल अशी व्याख्या मी करून घेतली.

असे फेरीवाले मुबईत किती आहेत? हा तर प्रचड वादाचा विषय. पुन्हा या फेरीवाल्यांमध्ये अधिकृत आणि अनधिकृत असे दोन गट. ज्याच्याकडे परवाने आहेत ते अधिकृत. असे परवाने देण्याच काम मुबई महापालिकेच. महापालिकेच्या नोदणीनुसार मुबईत दहा हजार फेरीवाल्याना परवाने देण्यात आले आहेत. या खेरीज किती फेरीवाले मुबईत आहेत याची महापालिकेच्या अधिकाऱ्याना कल्पना नाही. फेरीवाल्याच्या सख्येची वित्तबातमी असणारं दुसर खात म्हणजे पोलिस खात. ते म्हणतात की, मुबईत लहान-मोठे धरून तीन लाख फेरीवाले आहेतच. पण गृहराज्य मत्री शरद पवार याना हा आकडा इकडा मोठा असावा, असं वाटत नाही. पत्रकाराशी बोलताना मत्री साहेब म्हणाले की, शहरात एक लाखभर फेरीवाले असावेत. बॉम्बे हॉकर्स युनियन ही या फेरीवाल्यांची सघटना. या सघटनेच्या नोदीनुसार शहरात दीड लाख फेरीवाले आहेत कारण तितके त्याचे सदस्य आहेत आणि कॉंग्रेस सारखे बोगस सदस्य नोदणी प्रकार त्याच्याकडे नाही. या सगळ्या आकड्याच्या गोतावळ्यातून मी असा निष्कर्ष काढला की, मुबईत एक ते दोन लाख फेरीवाले असावेत.

आता एक ते दोन लाख ही काही थोडी थोडकी सख्या नव्हे. जर इतके लोक हा व्यवसाय करून आपली उपजीविका करीत असतील तर तो व्यवसाय बद पाडण्याचा आपल्या लोकशाही शासनाला काय अधिकार? वगैरे बाणेदार प्रश्न, स्वातत्र्यात जन्मलेल्या माझ्या स्वतत्र मेंदूला टोचू लागले. पण परिस्थिती तशी नव्हती. या दीड-दोन लाखापैकी जवळजवळ पन्नास ते पच्याहत्तर फेरीवाले भाजीपाला, फळ वगैरे विकणाऱ्यांपैकी आहेत म्हणजे फेरीवाले या जातीतले ते अगदीच निरुपद्रवी प्राणी. जवळजवळ पचवीस हजार फेरीवाले, लॉटरीची तिकिट विकण, वर्तमानपत्र विकण वगैरेसारखे कुडुकमुडुक व्यवसाय करून पोटं भरतात. मुबईच्या पोलिसाची या मडळीविरुद्ध मोहीम नाही. ही मोहीम प्रामुख्यान आहे स्मगलर्ड माल विकणाऱ्या फेरीवाल्याविरुद्ध.

असे फेरीवाले मुबईत जवळजवळ पाऊण लाखाच्या घरात आहेत, अस मुबईपोलिसांच मत. पण प्रत्यक्षात ते इतके नसावेत. हे फेरीवाले प्रामुख्यानं फोर्टमधल्या महत्त्वाच्या रस्त्यांच्या फूटपाथवर जागा अडवतात. दाढीच्या रेझरपासून ते थेट कॅसेट टेपरेकॉर्डर्स आणि फिल्मी कॅमेऱ्यापर्यंत सर्व तऱ्हेच्या परकी बनावटीच्या म्हणून समजल्या जाणाऱ्या वस्तू या फेरीवाल्याकडे मिळतात. मोठ्या मोठ्या दुकानदाराना ठेवायला परवडणार नाही, इतक्या महागड्या वस्तू मुबलक प्रमाणात या फेरीवाल्यांकडे बघायला मिळतात.

रस्त्याच्या कडेला छोटासा लाकडी स्टँड टाकून धदा करायला बसलेल्या या प्रत्येक फेरीवाल्याचे पाच हजारांपासून अर्धा लाख रुपयापर्यंतच भांडवल या धद्यात गुतलेल असत. शिवाय हा धदा बिनबोभाट चालावा म्हणून फूटपाथशेजारच्या दुकानदाराला बहुधा महिना शभर-दीडशे रुपये भाडं द्यावं लागत. याखेरीज मायबाप सरकारचे दूत ठरलेल्या पोलिसाना आणि शहराची व्यवस्था पहाणाऱ्या महापालिकेच्या कार्यक्षम सेवकाना हप्त्यापोटी पन्नास ते शभर रुपये मोजावे लागतात, अस या फेरीवाल्यांपैकी एकान सागितल.

यावरून हे बिचारे फेरीवाले उगाचच पिळले जात आहेत की काय असा समज होईल. पण तस काही फारस नाही. कारण 'जनतेला उल्लू बनवणे' या राजकारणी लोकांच्या तत्त्वावरच या फेरीवाल्याचाही धदा चालू आहे. आम्हा भारतीयांचं देशावर किती प्रेम आहे याचा अदाज लागत नसला तरी विदेशी बनलेल्या मालावर त्यांच अथांग प्रेम आहे. या प्रेमाला स्मरून हे देशभक्त फेरीवाले आपला तथाकथित इपोर्टेड माल त्याच्या गळी उतरवतात. दिल्लीत बनणारा नकली ट्रांझिस्टर एखादा झिपऱ्या इथून जपानी मेकचा 'नॅशनल जापान' म्हणून मोठ्या झोकात घेऊन जातो आणि घरी जाऊन आपल्या नशिबासकट जपानचा उद्धार करतो. जबलपूर, अमृतसरकडे बनलेली मनगटी घड्याळ 'स्वीस मेड' म्हणून बड्या बापांच्या पोराच्या मनगटांवर विराजमान होतात.

या फेरीवाल्याची माहिती जमा करताना आणखी एक धमाल गोष्ट लक्षात आली, ती म्हणजे रस्त्यावर माल घेऊन बसतात ते सर्वच फेरीवाले त्याच्या मालाचे मालक नसतात. बरेचसे असतात फक्त नोकर, पगारी किंवा कमिशनवर. त्याचे मालक वेगळेच असतात. ते असतात मोठे मोठे शेट. मरीन ड्राईव्ह, नेपियन सी रोड, नाहीतर


फुकट फुकट फुकट

**पांढरे डाग**

गौतम औषधाने जवळजवळ ३० वर्षे पाढरे डागाचे रोग्यांना ६ दिवसात फायदा देऊन प्रसिद्धी मिळविली आहे. एक पॉकेट औषध फुकट मागवून फायदा मिळवा.

**गौतम आयुर्वेद भवन (SD-2)**

वांद्रयाच्या एखाद्या प्रशस्त फ्लॅटमध्ये गुलजार रहाणारे.

पोलिसानी फेरीवाल्याचे स्टॉल्स उडवले. आता मोर्चे निघतील. निदर्शन होतील. चर्चा मसलती होतील पण फोर्टमध्ये पुन्हा कधीही फेरीवाल्याना बसू न देण्याचा निश्चय शरद पवारानी जाहीर केला आहे. आता हा धदा करवून घेणारे बडे बडे शेटिये दुसरे धदे शोधतील. तिथ आपला जम बसवतील. पुन्हा पैसे मिळवतील. वांद्रयाचे आणि नेपियन सी रोडवरचे त्याचे फ्लॅटस् तसेच राहतील. त्याची मुलं गाड्यातूनच फिरतील. पण बेकार झाले ते फोर्टमधले फेरीवाले. त्याचा रोजगार बुडाला. आंध्र प्रदेश नाहीतर तामीळनाडू नाहीतर केरळ मधल्या त्याच्या कुटुबाला आता दर महिना दीड-दोनशे रुपये जाणार नाहीत. ¤

# आम्ही लढलो ! आम्ही रडलो !! आम्ही हरलो !!!

आपण आणखी एक विक्रम प्रस्थापित केला हे ऐकून मला अपार आनद झाला. विक्रम मग तो कसाही असो ऐकूण ग्रेटच. अशा प्रत्येक ग्रेट विक्रमासद्दल प्रत्येक भारतीयाला ग्रेट आनद व्हायला हवा तसा तो मलाही झाला. इग्लड नामक एका फिरगी देशाच्या क्रिकेटनामक एक खेळ खेळणाऱ्या सघान भारताचा तोच खेळ खेळणारा एक सघ अवघ्या बेचाळीस धावात म्हणे बाद केला. कसोटी क्रिकेट मधल्या भारताच्या धावाचा म्हणे तो निच्चाक होता. आता निच्चाक झाला म्हणून काय झाल तोही एक विक्रमच ना? त्याबद्दल आपण आनद मानला नाही, तर त्या बिचाऱ्या विक्रमाला काय वाटेल ?

तर आपण दुसरी टेस्टही हरलो. छे ! इतक्या तुफान पराभवाला नुसत हरलो म्हणणं म्हणजे एखाद्या पुलत्झर पुरस्कार मिळवणाऱ्या पत्रकाराला 'खबऱ्या' म्हणण्यासारख आहे. म्हणून या पराभवाला आपण हरलो न म्हणता 'चारी मुड्या चीत' झालो, अस म्हणू म्हणजे या पराभवातही एक प्रकारची 'ग्रेस' दिसेल.

तसा हरण्याचा हा काही पहिलाच प्रसंग नव्हे आपण भारतीय नेहमी हरण्यासाठी आणि कधीमधी जिकण्यासाठीच जन्माला येतो. पण एक दोनदा जिकलो की आपण त्या जिकण्याशी इतके विलक्षण एकरूप होतो की, पूर्वी आपण कायम हरायचोच हे पार विसरून जातो. मग पुन्हा एकदा आपण हरतो आणि आपण थाड्कन् जागे होतो. प्रथम आपला त्यावर विश्वासच बसत नाही. मग बसतो. त्यानतर आपण या हरण्याच खापर फोडायला बकरा शोधतो. तसा यावेळीही आपण बकरा शोधला. शोधला म्हणजे, तसा तो आयताच सापडला. अजीत वाडेकर. लागोपाठ तीन मालिका जिकल्याबद्दल महिना दोन महिन्यापूर्वीपर्यंत ज्याला कोटी कोटी भारतीय तितके आशीर्वाद देत होते, तो अजित कर्णधार वाडेकर. आपला सघ बेचाळीस धावात बाद झाला तो जणू वाडेकरच्या सागण्यावरूनच अशा स्टायलीत आम्ही तमाम मडळी त्याला शिव्या घालतोच.

म्हणे वाडेकरला फॉर्म राहिला नाही, म्हजे त्याला कॅप्टनशीप जमत नाहीये, म्हणे त्याचं बेदी, व्यकटशी भाडण झालय. अशा अनेक म्हणे म्हणेच्या म्हणी तमाम क्रिकेट शौकिनाच्या तोडात रुळू लागल्यात.

खरं आहे. आम्ही हरलो. अजीत वाडेकरन दोन्ही टेस्टच्या चारही डावात एकदाही विशी ओलाडली नाही, हेही खरं आहे. पण वाडकर म्हणजे सारा सघ नव्हे ब्रिजेश पटेलला आणि मदनलालला प्रत्येकवेळी पांचाच्या आत तबूत परतायला वाडेकरन सागितल नव्हत. चारपैकी दोन डावात भोपळे आणण्याचा आदेश इजिनियरला वाडेकरन दिला नव्हता. बेदीचे गुडलेग्थ चेडू फोडून काढा असा कानमत्र वाडेकरन एमीस, डेनिस, फ्लेचर आणि ग्रेगला दिला नव्हता. फिल्डिग करताता चद्राच्या बोटाला दुखापत व्हावी अशी वाडेकरन प्रार्थना केली नव्हती. असो. एकूण हा पराभव म्हणजे एकट्या वाडेकरची जबाबदारी नव्हे.

आपला दारुण पराभव झाला. आकाशवाणीच्या भाषेत म्हणजे, 'भारत के सघने क्रिकेट के जगत् में अपना नाम खो दिया।' हे काही नवं नाही. विजय हजारे पासून ते पतौडीपर्यंत भारताच्या सर्वच कप्तानानी असे सडकून पराभव खाल्ले आहेत. फक्त वाडेकर त्याला अपवाद होता पण तोही आता या मालिकेत बसला. पण झाला हा पराभव आश्चर्यकारकच होता. ही मॅच संपल्यावर एकजण उद्वेगान म्हणाला की, सगळ्या सघाला आता चालत घरी पाठवायला हव आणि ब्रिजेश आणि मदनलालला तर लगडी घालीत. □ □

---

मराठवाडा आंदोलन—उत्तरार्ध या अंकात जागेअभावी प्रसिद्ध होऊ शकला नाही. तो पुढील अकात प्रसिद्ध होईल. —संपादक

---

# कुआलालुंपूरची मुस्लीम राष्ट्रांची परिषद

**वा. दा. रानडे**

लाहोरच्या इस्लामी शिखर परिषदेनंतर चार महिन्यांनी मलेशियात कुआलालुपूर येथे इस्लामी राष्ट्राच्या परराष्ट्र मंत्र्याची परिषद नुकतीच झाली. लाहोरच्या इस्लामी शिखर परिषदेवर लिहिताना मी केलेली टीका (माणूस, ९ मार्च १९७४) या परिषदेलाही लागू पडते. धर्माच्या नावावर भरविलेल्या अशा परिषदातून राजकीय प्रश्नच अधिक चर्चिले जातात. अरब राष्ट्रे व पाकिस्तान अशा परिषदाचा उपयोग आपले राजकीय उद्देश साधण्यासाठी करतात. कुआलालुपूरला तेच घडले. जरुसलेम मुक्त करून त्यावर अरब सार्वभौमत्व प्रस्थापित करण्यात आले पाहिजे अशी मागणी करणारा ठराव राबात परिषदेपासून प्रत्येकवेळी पास करण्यात येत आहे. तो पुन: एकदा पास करण्यात आला. ठराव पास करण्यापलीकडे अरब राष्ट्रे या बाबतीत कोणताही परिणामकारक उपाय योजू शकलेली नाहीत. व त्याच्यातील अतर्गत विरोध व मतभेद लक्षात घेता कोणतीही परिणामकारक कारवाई ते करण्याची शक्यता नाही. जरुसलेमवर अरब सार्वभौमत्व म्हणजे कोणत्या अरब राष्ट्राचे सार्वभौमत्व हे लाहोर परिषदेच्या ठरावाप्रमाणेच यावेळीही सदिग्ध ठेवण्यात आले. कारण अरब राष्ट्रातच या प्रश्नावर मतभेद आहेत.

लाहोर परिषदेची सधी साधून पाकिस्तानने बागला देशाला मान्यता दिली तसे यावेळी भारताच्या अणुस्फोटाचा प्रश्न उपस्थित करून सर्व मुस्लीम राष्ट्राचे विशेषत: अरब राष्ट्राचे मत भारताविषयी कलुषित करण्याचा प्रयत्न केला. भारताने इस्राइलच्या सहकार्याने अणुस्फोट केला असा धादात खोटा आरोप करण्यापर्यंत पाकचे परराष्ट्र मंत्री अझीझ अहमद याची मजल गेली. आपण असे बोललोच नाही असा खुलासा त्यांनी नतर केला पण परिषदेतील भाषणाचा अधिकृत वृत्तांत वृत्तपत्राना देणाऱ्या विभागानेच हा वृत्तात दिला होता हे लक्षात घेता हा खुलासा विश्वासनीय कसा मानता येईल ? पाक गोटातून याबाबत असे सांगण्यात आले की अझीझ अहमद यानी भाषण केले पण ते खासगी असून प्रसिद्धीसाठी नव्हते अशी त्यांची कल्पना होती. परिषदेत केलेले भाषण खासगी कसे असू शकेल ? एखाद्या प्रश्नावर खुली चर्चा नसेल तर तसे आधी जाहीर केले जाते. या साऱ्या गोष्टी लक्षात घेता अझीझ अहमद यांचा नतरचा खुलासा म्हणजे खोटा आरोप अगलट आल्याने केलेली सारवासारव आहे. असे असले तरी या प्रश्नावर ठराव पास करून घेण्यात पाकला अखेर यश आले. अण्वस्त्रधारी राष्ट्रापासून बिगर अण्वस्त्रधारी राष्ट्रांना धोका असून त्याना सुरक्षिततेची हमी देण्यासाठी उपाय यूनोने योजावे अशी मागणी ठरावात केली आहे. भारताच्या स्फोटाचा त्यात नुसता उल्लेख केलेला आहे. पण निषेध नाही, ठरावात केवळ भारताच्याच स्फोटाचा उल्लेख का ? वास्तविक या स्फोटाच्या आगेमागे फ्रान्स, चीन, ब्रिटन यानीही स्फोट केलेले आहेत त्यांचा उल्लेख का नाही ? भारताचा उल्लेख करावयाचा तर या राष्ट्राचाही हवा. पण तसा आग्रह कोणी धरलेला दिसत नाही. ठरावात कोणत्याच राष्ट्राच्या नावाने उल्लेख नको असे सौदी अरेबिया, बागला देव, अफगाणिस्तान, मलेशिया याचे म्हणणे होते पण त्यानीही त्याबाबत फारसा आग्रह धरला नाही.

मुस्लीम अल्पसख्याकाची आतरराष्ट्रीय परिषद भरवावी असा विषय परिषदेपुढे आला पण कार्यक्रमपत्रिकेतून तो वगळण्यात आला. परिषदेच्या सचीव मडळाचे मुख्य सचीव (सेक्रेटरी जनरल) हसन अल तोहा यांनी ही सूचना मांडली होती. लिबिया व पाकिस्तानची या सूचनेस पाठिंबा देण्याची तयारी होती. पण हा विषय यापूर्वी कोणत्याही पातळीवर कधी चर्चिला गेला नसता तो परिषदेपुढे आणण्याचा तोहामी याना अधिकार नाही अशी हरकत परिषदेस उपस्थित असलेल्या उपराष्ट्राच्या प्रतिनिधीपैकी बहुसख्य प्रतिनिधीनी घेतली आणि हा विषय यावेळी वगळण्यात आला. पण यावेळी तो वगळला गेला म्हणून नेहमीच वगळला जाईल असे मानण्याचे कारण नाही. अधिक पद्धतशीर पूर्व तयारी करून. निरनिराळ्या पातळ्यावर आधी चर्चा करून ही सूचना पुढच्या परिषदेत मांडली जाण्याची शक्यता आहे.

मुस्लीम अल्पसख्याकाच्या परिषदेची सूचना परिषदेत चर्चिली गेली नाही तरी मुस्लीम अल्पसख्याकाचे प्रश्न परिषदेने वर्ज मामलेले नाहीत हे फिलिपाईन्समधील मुस्लिमाच्या प्रश्नावर झालेली चर्चा व ठराव यावरून स्पष्ट झाले. फिलिपाइन्समधून फुटून तेथील मुस्लीमाचे स्वतत्र राज्य स्थापण्याचा तेथील चळवळीमागे उद्देश आहे. परिषदेत झालेल्या भाषणात व ठरावात असा स्पष्ट उल्लेख करण्यात आलेला नाही. मुस्लीमांविरुद्ध लष्करी मोहीम थांबवा आणि त्याच्या प्रश्नावर राजकीय तोड काढा अशी परिषदेने पास केलेल्या ठरावात फिलिपाइन्स सरकारला विनती केली आहे, फिलिपिनी मुस्लीम कल्याण व सहाय्य सस्था स्थापण्यास परिषदेने मजुरी दिली व तिच्या कार्यासाठी लागणारा पैसा इस्लामी एकता निधीमधून दिला जावा असे ठरले. फिलिपिनी मुस्लीम कल्याण सस्था असे या संस्थेचे सोज्वळ नाव असले तरी तिला मिळणारी मदत अखेर फिलिपाइन्समधील मुस्लीमाच्या फुटीर चळवळीसाठी वापरली जाण्याचा धोका आहे. 'इस्लामी एकता निधी' असे या निधीचे नावही सोज्वळ असले तरी मुळात लिबियाच्या सूचनेवरून 'जिहाद निधी' म्हणून तो सुरू करण्यात आला हे विसरता येणार नाही. मुस्लीम अल्पसख्याकाना या निधीतून मदत दिली जावी अशी लिबियाची भूमिका आहे. अशी मदत करणे म्हणजे मुस्लीमेतर राष्ट्राच्या अतर्गत प्रश्नात हस्तक्षेप करण्यासारखे आहे असे बागला देश व अफगाणिस्तानला वाटते. पण फिलिपिनो मुस्लीमाना या निधीतून मदत करण्याचा ठराव परिषदेने पास केला यावरून बांगला देव व अफगाणिस्तानने उपस्थित केलेला मुद्दा बहुसख्य प्रतिनिधीना महत्त्वाचा वाटला नाही असे दिसते.

फिलिपाइन्समधील मुस्लिमाचा प्रश्न या परिषदेत उपस्थित करण्यात आला. याचा आधार घेऊन पुढच्या परिषदेत भारतातील मुस्लीमाचा प्रश्न किंवा काश्मीरचा प्रश्न पाक उपस्थित करण्याची शक्यता आहे. आणि भारतातील मुस्लिमाच्या मागण्याना पाठिंबा व परिषदेच्या निधीतून मदत दिली जाण्याचा सभव आहे. असे निर्णय घेतले गेल्यास तो भारताच्या अतर्गत कारभारात हस्तक्षेप होईल आणि येथील मुस्लीम जातीयवाद फोफावण्यास खतपाणी केवळ पाककडून नव्हे तर इस्लामी राष्ट्राच्या परिषदेकडून मिळेल. हा धोका वेळीच लक्षात घेतला पाहिजे.

मुस्लिम अल्पसख्याकाबाबत वास्तविक योग्य भूमिका म्हणजे ज्या देशात ते राहतात तेथील नागरिक त्यानी खऱ्या अर्थाने बनून राष्ट्रीय जीवनाशी समरस झाले पाहिजे. त्या देशात रहायचे नसेल तर त्यानी सरळ देश सोडून जावे. अल्पसख्याकाच्या न्याय्य हक्काचे सरक्षण झाले पाहिजे हे खरे त्यासाठी त्यानी जरूर झगडावे पण जेथे रहातो त्या देशालाच त्यांनी आपला देश मानले पाहिजे. फिलिपिनो मुस्लीमाबाबत ही भूमिका परिषदेत कोणीच माडली नाही. □

निपाणी भागातील शेतकऱ्यांच्या व श्रमिक कामगारांच्या

# एका होरपळीची कहाणी

महादेव मोरे

एका मराठी चित्रपटातील एक नामांकित पात्र सारख म्हणत असत– ' अख्ख्या होल इंडियात... ' वगैरे वगैरे. तर त्याच चालीवर अस म्हणता येईल की, अख्ख्या होल इंडियात निपाणी-सारख इसराल गाव नाही. इथल्या व्यापाऱ्याकडून जगातील व्यापाऱ्यांनी धडे घ्यावेत, अन् टग्यांकडून टग्यानी. नाहीतरी टगे व व्यापारी ह्याचा घनिष्ट संबंध असतोच. त्यामुळे टगे व्यापारी किंवा व्यापारी टगे म्हटले तरी काही बिघडत नाही.

निपाणी व भोवतालचा परिसर म्हणजे अख्ख्या होल इंडियातील तंबाखूच आगर. इथल्या लोकांसारखाच कडक (व कडवटही) तंबाखू कुठे पिकत नाही, पिकणारही नाही ! त्यामुळे मुंबई, मद्रास, कलकत्ता, नागपूर इ. दूरदूरच्या ठिकाणाहून ' बिचाएत ' लोक येथे येतात. येथील व्यापाऱ्याची ही ' कुळ ! ' येथील व्यापाऱ्याकडून ही ' कुळ ' तंबाखू ' तयार करवून ' घेतात. मग हा नामांकित व्यापारी ह्या कुळाना जसा कापतो तसा तंबाखू पिकविणाऱ्या शेतकऱ्यानाही लंबे करतो ! इथल्या तंबाखूच्या व्यापाऱ्याची एक अदृश्यपण दृढ अशी संघटना आहे. वारा जसा ' दिसत ' नाही, पण ' जाणवतो, ' तसेच ह्या संघटनेच्या बाबतीत आहे. त्यामुळे तंबाखूच्या खरेदीचा एक न् ठराविक दर पडला की तोच जमिनीत खोलवर मुळे पसरून ठाम रहातो; अन् अर्थातच त्यात शेतकरी पिळला जातो...

ह्या वर्षी तंबाखूचे पीक चांगले आले होते. शेतकरी वर्ग खुशीत होता. तंबाखू विकून चार पैसे हाती खुळखुळायला लागतील, पाव-साळ्यात डोईवर झालेले कर्ज फिटेल, बायका-मुलाना चार-दोन नवीन कपडे घेता येतील, अशी अनेक स्वप्ने, बऱ्याच उड्या, पुष्कळ मनोरथ. पण मार्चच्या मध्यास तंबाखूच्या खरेदीच्या हंगामास आरंभ झाला, व्यापाऱ्याच्या मोटारी आजूबाजूच्या खेड्यावरील धुरळा-फुफाटा उडवीत धावू लागल्या. शॅम्पलसाठी सरसर बिड्या वळून फकाफका फुकल्या जाऊ लागल्या, आणि तंबाखू मागायला मणाला १५–२० रुपयापासून व्यापाऱ्यानी सुरुवात केली, तेव्हा स्वप्नाच्या दुनियेत वावरणाऱ्या शेतकऱ्याचे पाय जमिनीवर टेकले. त्याला घाम फुटला. मग तंबाखूच्या दर्जानुसार हे दर मागे पुढे होऊ लागले. अगदी चांगल्यात चांगल्या, पहिल्या प्रतीच्या तंबाखू-लाही कुणी ८०–९० रुपयाच्यावर हिंगलेना ! त्यातही काडी-माती वगैरेची म्हणून मणाला अडीच-तीन किलोची ' सूट ' निराळीच !

' तंबाखूचे दर असे का उतरावेत ? ' ह्याचे उत्तर कुठलाही व्यापारी चटकन देतो की, सरकारने तंबाखूवरील कर वाढविली म्हणून... ' तर सरकारने कर वाढविला तो वर्षाला लाखो रुपये कमविणाऱ्या व्यापाऱ्यानी (तंबाखूच्या शेतकऱ्यांना वाजवी दर देऊन) स्वतःच का भरू नये ? सरकार एखादा कर बसविते. पण त्याची झळ अशी तळापर्यंत पोहचून वरचा वर्ग मात्र सुरक्षित रहातो. येथील व्यापाऱ्यानी हेच केले. ड्यूटी वाढली, अशी ओरड करीत शेतकऱ्याची अक्षरशः लूटमार केली–

अशा प्रकारे तंबाखू पिकविणाऱ्या शेतकऱ्याची पद्धतशीर लूटमार केली जाऊ लागली. गेल्या वर्षापेक्षा ह्या वर्षी तंबाखूच पीक दुपटीन येऊनही निम्मेही पैसे कुणा शेतकऱ्याच्या हाती पडले नाहीत. दर निम्म्याहून खाली घसरवून व्यापाऱ्यानी शेतकऱ्याना अक्षरशः लुटलं ! उदाहरणच द्यायचे झाले तर येथून जवळच असलेल्या ' मुगळी ' (ता. कागल, जि. कोल्हापूर) या गावी गेल्या वर्षी नऊ ट्रक्स तंबाखू झाला होता अन् त्याची किंमत म्हणून पाच लाख रुपयाचे वाटप झाले होते, तर ह्या वर्षी तेरा ट्रक्स तंबाखू होऊनही केवळ तीन लाखाचे वाटप झाले ! गेल्या वर्षापेक्षा चालू वर्षी सर्वच जीवनावश्यक वस्तूचे भाव दुपटी-तिपटीने वाढलेले असताना तंबाखूच्या खरेदीचे भाव मात्र असे घरंगळतात अन् निम्म्याहून खाली येतात, हे काय गौडबंगाल आहे ? तर अशी ही करामत केवळ निपाणीचाच व्यापारी करू जाणे, अन् त्याने ती केलीही ! त्यामुळे तंबाखूचे पीक समाधानकारक येऊनही लागवड-मशागती-चेही मूल्य शेतकऱ्याला मिळाले नाही आणि ज्यानी तंबाखूच्या भावी पैशाच्या आधारावर पावसाळ्यात कर्जे काढली होती, त्याचे व्याजही फिटणे मुश्कील होऊन बसले ! ह्या अशा सर्व परिस्थिती-मुळे काही उटावर बसले लोक असा सहज सल्ला देतात की, शेत-कऱ्यानी तंबाखूचे पीक न काढता अन्य पिके काढावीत ! पण हे लोक सर्वसामान्य शेतकरी ज्या परिस्थितीत जगतो, तिकडे संपूर्ण दुर्लक्ष करतात. पावसाळ्याच्या दिवसात सर्वसामान्य शेतकऱ्याची दैना दैना उडालेली असते. त्याला जीवनावश्य वस्तूसाठी व शिवारा-तील पिकाच्या लागवडीसाठी पैशाची अत्यंत आवश्यकता असते. अशा वेळी तो हीन दीन झालेला शेतकरी लाचारपणे तंबाखू व्यापाऱ्याकडे धाव घेतो– ' शेटजी-अण्णा ' म्हणत कर्जासाठी हात पसरतो, ' तंबाखू आल्यावर तुमच्याच वखारीत लावतो, त्यातून हे पैसे वळते करून घ्या ' म्हणून करुणा भाकतो. ह्यावर तो तंबाखूचा व्यापारी आपण त्याच्यावर मोठेच उपकार करतो आहोत, ह्याची त्याला पुरेपूर जाणीव करून देत त्याची गरज सारतो, आणि अशा प्रकारे पावसाळ्यातील कर्जानं मिंधा झालेला शेतकरी आपले तंबाखूचे पीक आल्यावर त्या धनको व्यापाऱ्याकडून पुरेपूर लुबाडला जातो. व्यापारी म्हणेल तो दर व तो धरील ती काडी-मातीची सूट! ह्या वर्षी कित्येक व्यापाऱ्यानी असे नाटक केले की, ' आपण आता

खरेदीच बद केली आहे, आपगास आता तंबाखूची गरजच नाही!' अन् मग तबाखू न विकले गेलेले वा न विकलेले किंवा पुढे एखादे वेळी दर थोडा अधिक मिळेल, तेव्हा तबाखू विकू—अशा विचाराने तबाखू न विकलेले शेतकरी हादरून गेले, अन् लाचार होऊन व्यापाऱ्याचे पाय धरण्यासाठी धावले. काहीही दर द्या, पण तबाखू एकदा घ्या—अशी अवस्था होऊन गेली. कारण तबाखू घरी ठेवून दळून काही खाता येत नाही, विकला तरच डोक्यावरील रीण हलके होण्याची शाश्वती, पुढल्या पावसाळयासाठीही काही आधार! अशा शेतकऱ्यांच्या मानेवर पद्धतशीर सुरी फिरवून व्यापाऱ्यानी शिरकाग केले, बळी घेतले. नाहीतरी ह्या तबाखूच्या व्यवहारात बळी जाणारेच अधिक; अन् सुरी फिरविणारे खाटीक तर टपूनच बसलेले असतात!

ह्या अशा सर्व प्रतिकूल परिस्थितीवर मात करण्यासाठी 'शेतकरी सहकारी सघा'सारखी एखादी सस्था निर्माण होण आवश्यक आहे. ह्या सस्थेमार्फत पावसाळ्यात शेतकऱ्याना कर्जे मिळावीत अन त्यांच्या तबाखूला वाजवी दर देऊन ती वळती करून घ्यावीत. पण सुखस्वप्नासारखे हे स्वप्न! कारण अशी सस्था स्थापन करण्या-इतकं बळ वा उभारी ह्या भडकल्या महागाईने होरपळून पूर्णपणे भुईसपाट होत असलेल्या सर्वसामान्य शेतकऱ्याच्या ठिकाणी नाही! आणि बडे जमीनदार? त्यांना तर तशी इच्छाच नाही. कारण त्याचे पूर्वापार लागेबाधे तबाखूच्या व्यापाऱ्याशी निगडीत आहेत, शिवाय त्यातील काही तर स्वत च तंबाखूचा व्यापार करणारे! मग स्वतःच्या पायावर स्वतःच कुऱ्हाड कोण मारून घेणार? अशाही परिस्थितीत कुणी महाभागाने तशी एखादी सस्था काढलीच तर त्याला आयुष्यातून उठविण्याचे सारे डावपेच व्यापारी जाणून असतात! त्याच्या तबाखूच्या पैशात तेवढी ताकद नक्कीच असते! तर ह्या ताकदीशी टक्कर देणारा एखादा स्पार्टाकसच जन्माला यायला हवा!

तबाखू व्यापाऱ्याची ही पिळवणूक केवळ शेतकरी वर्गापुरतीच सीमीत नाही, तर तबाखूच्या वखारीत काम करणाऱ्या मजूर बायका व दुकानातील दिवाणजी, हमाल, गडी हा श्रमीक वर्गही त्या पिळवणुकीच्या चरकातून सुटत नाही. अत्यत कमी पगारावर बारा-बारा, चोवीस-चोवीस तास हा श्रमीक वर्ग ढोर मेहनत करीत असतो. केवळ अडीच रुपयाच्या रोजगारावर मजूर बाईन बारा-बारा तास वखारीत राबल पाहिजे. निपाणीतील व आजूबाजूच्या पंचक्रोशीतील हजारो बायका शेकडो वखारीतून अशा अल्प मेहनता-न्यावर तबाखूच्या धुसकाटात राबत, कणामोडक आयुष्य जगत मरणाला जवळ करीत आहेत. सकाळी नऊ ते रात्री नऊ, मध्ये केवळ तासभर सुट्टी जेवणासाठी. परत रातपाळी वा पहाटपाळी असेल तर दुसऱ्या शिफ्टच्या बायकाची सोय नाही; सकाळी नऊलाच आलेल्या बाईन पहाटे सहापर्यंत एकवीस तास राबत पहाटपाळी केली पाहिजे. ना ह्या स्त्री कामगाराना कुठला मजूर विषय कायदा लागू ना नियम! मग सुखसोईतर दूरच! ह्या मजूर बायका जेथे राबतात त्या वखारी पाहिल्या म्हणजे पुरातन काळातल्या गुहाची आठवण येते. ना तेथे पुरेशी ताजी हवा खेळते, ना भरपूर प्रकाश असतो; ना पिण्याच्या पाण्याची पुरेशी सोय असते, ना मोकळेपणी श्वास घेता येतो, पूर्वी शिक्षा झालेले गुलाम राबत, तशा ह्या बायका राबतात. अनेकांच्या ह्या आया-बहिणी-पत्नी अशा ढोर मेहनतीने क्षणाक्षणाने, कणाकणाने मरणाला जवळ करीत आहेत. मुलगी नुकतीच कुठ लुगड नेसू लागली की तिला प्रथम वखारीतल्या कामाला पिटाळलं जात. लग्न होऊन नादायला आलेली नववधुही अगावरील हळद अजून पुरती निघून जायच्या आत येथे प्रथम वखारीत कामाला धाडली जाते. ह्या गरीब पोरीना सौंदर्याचाही शाप असतो...अशा काही पोरी बुभुक्षीत मालकाच्या पापी वासनेला बळीही पडतात! काही वखारीतील मुकादमीणी तर मालकाच्या 'अशा' सेवेसाठीच नेमलेल्या असतात. मग अशा वर्तुळात एकदा मुलगी खेचली गेली म्हणजे ती धारेला लागल्यासारखी कुठल्या कुठे वहावत जाऊन अखेर तिच्या जिण्याला वारयोषितेच नशीब वाट्याला येतं! तर अशा अनेक अभागी अहिल्या येथे गल्लोगल्ली दगड होऊन पडल्या आहेत—कुण्या श्रीरामाच्या पदस्पर्शाने पुनीत होऊन उद्धारून पुनीत होण्याची प्रतीक्षा करीत!

असा श्रीराम जन्माला येणार आहे का? असेल तर केव्हा? केव्हा ह्या असख्य अहिल्यांना सर्वसामान्य माणसाचे सन्माननीय जिणे जगायला मिळून ह्यांचा उद्धार होणार आहे?

सध्याच्या भडकल्या महागाईचा विचार केला तर वखारीतल्या ह्या मजूर बायकांचा साडेतीन चार रुपये रोजगार व्हायला हवा. तसेच त्याच्याबरोबर श्रमणारे हे अनेक कारकून व हमाल, ह्यांचाही पगार सध्याच्या दुप्पट व्हायला हवा. त्याचप्रमाणे मरणाचे सापळे असलेल्या ह्या वखारी रद्दबादल ठरवून नव्या प्रशस्त हवेशीर वखारी बांधायला हव्यात, तरच ह्या मजूर बायका अकाली रोगाचे भक्ष्य बनून मरणाकडे वाटचाल करणार नाहीत. पावसाळ्यात काम बद पडून ह्याना बेकारीत काळ कठावा लागतो तेव्हा निम्मी रोज-गारी मिळायला हवी. कामाच्या काळात एखादी मजूर बाई आजारी पडली तर तिच्या औषधपाण्याचा खर्च मालकाने सोसायला हवा. मुबई, कलकत्ता, मद्रास आणि मोठमोठाल्या शहरातील कामगार सघटनाचे नियम वा कायदे पाहिले तर वरील किमान अपेक्षा वा मागण्या अगदीच जुजबी वा मामुली वाटाव्यात! पण त्या ह्या गावात उच्चारणेही हास्यास्पद ठरावे, इतके कामगार वर्गाला आपली पूर्वापार चाकोरी अगवळणी पडलेली आहे! बाहेरील कामगार जगतात सप, हरताळ, घेराओ इ आयुधे वापरून आपल्या मागण्या मान्य करून घेतल्या जातात. पण येथे आपल्याही काही मागण्या आहेत, असाव्यात, हेच जेथे मजूर वर्गाला ठाऊक नाही, तेथे डोक्यावरून इतके पाणी निघून गेले तरी काय होय? दिल्या पगारावर राबणे हेच न् एवढेच केवळ न् फक्त ठाऊक! आपण ह्या वखारीत रात्रंदिवस राबतो अन् ह्या व्यापारी वर्गाला लाखा-लाखानी नफा मिळवून देतो, त्याच्या ह्या गडगज फायद्यात आप-लाही काही एक हक्काचा, श्रमाचा वाटा आहे, अंश आहे, निदान असावा, हे येथे श्रम करणाऱ्या वर्गाला ज्ञातच नाही! येथे कम्यु-निझम माडायचा नाही. कारण श्रीमत आपल्या कर्तृत्वाने श्रीमत होत असतो, तर गरीब आपल्या कर्मानि गरीब रहात असतो. पण 'जगा व जगू द्या' हे तत्त्व तरी किमान रहावे. शेतकरी व मजूर वर्गाला असे तळामुळातून पिळून काढून किती दिवस अशा तुवड्या

भरल्या जाणार आहेत ? महाराष्ट्रातील शेतकरी उसाच्या पैशावर ट्रक्स, टुरींगा, स्कूटर्स उडवितो, शेतीला ट्रॅक्टर सारखी आधुनिक साधने खरेदी करतो आणि इकडे निपाणी भागातील तंबाखू पिकविणारा शेतकरी मात्र ढुंगणावरच्या धोतराच्या धड धडप्याला मात्र महाग होऊन बसतो ! ह्या उलट तंबाखूचा व्यापारी मात्र खोऱ्याने पैसा ओढतो. ४–४, ५–५ कार्स बाळगू शकतो, लाख–दोन लाखाचे बंगले सहजासहजी बांधू शकतो, खोटया हिशेबाने दोन नंबरचा पैसा वारेमाप साठवू शकतो आणि तो पैसा कुठे न कसा खर्चावा, गुंतवावा हीच एक चिंता करीत नाना खटपटया करीत रहातो... कुठे ते चित्र आणि कुठे हे चित्र !

तंबाखूच्या धुस्काटात, धुरोळचात, वर्षानुवर्षे राबलेली मजूरबाई एखादे वेळी आजारी पडली न् औषधोपचाराचा हजार पाचशेचा खर्च अकस्मात उभा ठाकला तर ती औषध वगैरे घेऊन बरे होण्यापेक्षा मरणेच जास्त पसंत करील अशी येथील स्थिती. वास्तविक सरकारला दरवर्षी कोटयवधी रुपये मिळवून देणाऱ्या ह्या तंबाखूच्या धंद्यात काम करणाऱ्या श्रमिक मजूर वर्गाला संरक्षण देण्यासाठी शासनाने खास कायदे करायला हवेत. त्यांचा रोजगार, त्यांचे श्रममूल्य बांधून द्यायला हवे, त्यांच्या किमान गरजा भागविणाऱ्या सोई उपलब्ध करून द्यायला हव्यात. पण केंद्र सरकारचे जसे हजारो मजुरांच्या ह्या प्रश्नाकडे लक्ष नाही, तसे कर्नाटक सरकारचेही नाही. ह्या शासनाला निपाणी भागातील हे सीमावासीय असे परस्पर दिसामासांनी मेले तर हवेच आहेत. कारण ह्या श्रमिक व शेतकरी वर्गात बहुसंख्य समाजच मोडतो, अन् तो तर महाराष्ट्र धार्जिणा आहे ! मग कर्नाटक सरकारची ह्या प्रश्नाकडे सहानुभूती कशी असावी !

तर आता कोल्हापूरच्या व सांगलीच्या नायकिणींनी आपापल्या सुऱ्यांना आताच धार लावून ठेवावी. कारण ह्यावर्षी तंबाखूच्या धंद्यात दो हातांनी पैसा ओढणाऱ्या व्यापाऱ्यांच्या नोटांची वंडले त्यांच्याच माडीवर सुटणार आहेत ! ह्याच दोन नंबरच्या पैशाखाली त्यांचे बिछाने सजविले जाणार आहेत ! ! इकडे बकरे तयार होताहेत, चरबी धरताहेत, तिकडे तुमच्या सुऱ्यांनाही तुमच्या नयनबाणांसारखीच तेज धार चढवा ! !

□ □



# सोलकढी

## □ एक लिहिता ज्ञानेश्वर

एक लिहिता माणूस म्हणून ज्ञानेश्वर नाडकर्णी सर्वांना ठाऊक आहेत. गेली अठरा-वीस वर्षे अखंडपणे ते काहीबाही लिहिताहेत. सध्याच्या त्याच्या लिखाणावरून तसे वाटत नाही ते सोडा. नाडकर्णी किती उत्साहाने लिहितात. नविनानी हा गुण त्याच्यापासून घेण्यासारखा आहे. आणि लिखाणात सहजता तरी किती. शब्द जुळवत अर्धे पान लिहिताना आम्ही घामाघुम होतो. तोपर्यंत ज्ञानेश्वर महाराज आठदहा माहितीपूर्ण, पांडित्यप्रचुर, विचारपरिप्लुत इंग्रजी-मराठी लेख लिहून त्याची कच्ची मुद्रिते पाहायला मोकळे झालेले असतात. लिहिणे या नाडकर्ण्यांच्या ज्ञानेश्वरात इतके भिनले आहे की त्याने कोऱ्या कागदावर नुसते बोट ठेवले तरी त्यातून अक्षरे आपोआप ओघळून आपल्या जागा घेतात.

नाडकर्णीचे हे लिहिणे कित्येकाना समजतच नाही. नाडकर्णी आपल्या राखीव सदरातून काहीतरी सैरभैर भरकटभारूड डफरावून देतात, असे ते कित्येकजण म्हणतात, मला मात्र तसे वाटत नाही. नाडकर्णींच्या भरकटण्याला निश्चित दिशा असते; त्याच्या वरवरच्या अस्ताव्यस्तपणात एक अतर्गत शिस्त असते. नाडकर्णीचे लिखाण वाचायला अंगी एक कसब यावे लागते : ते आले की नाडकर्णीसारखे तर्कशुद्ध, सारासारविवेकी, व्यवस्थित, सुनियंत्रित, काटेकोर, रेखीव, टापटिपिचे लिहिणारा एक अनतराव सोडता सदरकार मराठीत नाही, असा निर्वाळा निष्पक्षपाती वाचकाना द्यावा लागेल.

अर्थशास्त्र हा जसा देशमुखाचा (आपले सी. डी. हो) तसा नाटक चित्रपट हा नाडकर्णींचा खास विषय आहे. शाळेत अकलिपीत दडवून नाडकर्णींनी स्टॅनिस्लाव्हस्की वाचल्याच्या आख्यायिका आम्ही ऐकल्या आहेत. बाबासाहेब पुरदऱ्याची क्षत्रियकुलावतस गोब्राह्मण प्रतिपालक छत्रपती शिवाजी महाराजांवर नसेल इतकी ज्ञानेश्वर नाडकर्णींची नाटक-चित्रपटावर निष्ठा आहे. नाटक-चित्रपटातल्या विविध घटकाबद्दल ज्ञानेश्वर नाडकर्णींनी ह्यातभर अभ्यास करून काही मते बनवली आहेत. ही मते ते कडव्या आग्रहाने माडतात. लोकाना त्याचा आग्रह खुपतो; मी समजुतदार असल्यामुळे मला नाही तो खुपत. त्याचा आग्रह म्हणजे निष्ठेच्या मखमलीतले काटे आहेत, असे मी मानतो.

नाटक-चित्रपटाबद्दल ज्ञानेश्वर नाडकर्णींची निष्ठा अशी जाज्जवल्य असल्यामुळे त्या विषयामधला पाखडीपणा त्याना अजिबात सहन होत नाही. आमच्याकडून तो प्रमाद नुकताच घडला. १ जून १९७४ च्या 'माणूस'मध्ये, 'सोलकढी' या आमच्या लोकलट्टू सदरामधून, 'सुगंधी कट्टा' आणि डॉ. श्रीराम लागू यांच्याबद्दल आम्ही लिहिले. गभीर प्रौढाईने आणि जबाबदार शहाणपणाने लिहायची एक सहज सवयच आम्हाला लागलेली आहे. म्हणून त्या लहानशा स्फुटातसुद्धा सुरुवातीला डॉ. श्रीराम लागूंच्या नटनाटकी कारकीर्दीचा आढावा घेतला होता. असा एखादा आढावा घेताना स्वतः ज्ञानेश्वर नाडकर्णी नेहमी तौलनिक विचार करतात, असे मी पाहून ठेवले होते त्यामुळे त्याचे अनुकरण करीत मी डॉ. श्रीराम लागू आणि इतर जिवंगत व दिवगत नट याची तुलना करून पाहिली.

आणि तेथेच आमचे चुकले. ज्ञानेश्वर नाडकर्णींच्या मते सगळ्या जिवगत नटात डॉ. श्रीराम लागू सर्वश्रेष्ठ आहेत; परतु दिवगत नानासाहेब फाटकांशी मात्र त्यांची तुलना होऊ शकत नाही. आमच्या प्रकृतीला असा अतिरेकीपणा मानवत नसल्यामुळे आम्ही डॉ. श्रीराम लागूंना 'बऱ्यापैकी' असे विशेषण बहाल करून निकालात काढले होते. आता यातसुद्धा जर कोणाला डॉ. लागूंची स्तुती दिमत असेल तर त्याने आपल्या डोळ्याचा उपयोग पाहण्याऐवजी ऐकण्यासाठी करावा, असे आम्ही सुचवतो.

आम्ही या स्फुटाच्या पुढील भागात, 'सुगंधी कट्टा'मधील डॉ. श्रीराम लागूंच्या भूमिकेची स्तुती केली आहे, असेही ज्ञानेश्वर नाडकर्णींनी त्याच्या पोक्त टीकालेखात (प्रभजन : १६ जून १९७४) उठवले आहे. आम्हाला चित्रपटातले काही समजत नाही आणि ज्ञानेश्वर नाडकर्णींना त्यातले सगळे समजते हे खरोखर खरे असले तरी "'सुगंधी-कट्टा'मधील जयश्री गडकरच्या सेक्सशी लागूचे अभिनयकौशल्य स्पर्धा करू शकत नाही" एवढेसुद्धा आम्हाला समजू शकणार नाही, असे ज्ञानेश्वर नाडकर्णींनी मानावे, यामुळे मी फार्फार व्यथित होऊन गेलो.

मात्र या व्यथेवरसुद्धा आनदाचे छान विरजण पडले आहे. कारण ठोकण्यासाठी का होईना पण ज्ञानेश्वर नाडकर्णींसारख्या एका सर्जनशील समीक्षकाने आमच्या दिशेने आपला लिहिता हात पुढे केला याने आम्ही धन्य झालो आहोत. लोक म्हणतात : ज्ञानेश्वर नाडकर्णींनी लिहिलेले वाचतो कोण ? मला ते पटत नाही. एक म्हणजे मी तरी ज्ञानेश्वर नाडकर्णींनी लिहिलेले गेली अठरा-वीस वर्षे वाचतो आहे आणि दुसरे म्हणजे कोणी वाचत नसेल तर, अगदी ज्ञानेश्वर नाडकर्णी झाले तरी, अठरा-वीस वर्षे कशाला हो लिहीत राहतील ?

—अनंतराव

महंमद करीम छगला
यांच्या आत्मचरित्राचा
धावता परिचय

अनुवाद : विनय धुमाळे
लेखांक : तीन



# ROSES IN DECEMBER
# रोझेस इन डिसेंबर

एम.सी.छागला

मी जेव्हा दिल्लीला सेटलवाड यांच्याकडे रहात होतो तेव्हा एके दिवशी अचानक मला श्री. गोविंद वल्लभ पंत यांनी जेवणाचं आमंत्रण दिलं. हे खास आदरातिथ्य कशाकरता व तेही इतकं अचानक ! मला काही त्या मागचं कारणच समजेना. ठरल्याप्रमाणे मी पंतजींकडे जेवायला गेलो. पहिल्या औपचारिक गप्पांनंतर पंतजी अगदी सहजपणे मला म्हणाले, ' छगलाजी, तुम्ही आत्तापर्यंत अनेक भूमिकेतून देशाची सेवा केली आहे आणि आत्तासुद्धा तुम्हाला आमच्याकरता काहीतरी खास असं करावं लागणार आहे. ' आणि पुढे ते म्हणाले, ' या गोष्टीला खुद्द पंतप्रधानसुद्धा फार महत्त्व देत आहेत. ' मी म्हणालो, ' देशाची सेवा करण्याची जेव्हा जेव्हा मला संधी येईल तेव्हा मी काही मागे राहाणार नाही. पण इतक्या तातडीची बाब आहे तरी काय ?' तेव्हा पंतजींनी एका झटक्यात सांगून टाकलं की, ' लाईफ इन्शुरन्स कॉर्पोरेशन ऑफ इंडियाच्या कारभाराची चौकशी, एकाधिकार चौकशी समितीतर्फे करावयाची सरकारची इच्छा आहे आणि त्या वन् मॅन कमिशनची धुरा तुम्ही सांभाळावी, असं पंतप्रधानांचं मत आहे.' लाईफ इन्शुरन्स कॉर्पोरेशन-बाबत पुष्कळच चर्चा लोकसभेत होत होती. मी त्यावर त्यांना सांगितलं की, यामुळे मुख्य न्यायमूर्ती म्हणून माझं जे काही काम आहे, त्याच्याकडे दुर्लक्ष होण्याचा संभव आहे. त्यावर पंत म्हणाले, की, ' देशाच्या दृष्टीने आयुर्विमा महामंडळाच्या चौकशीचं कामसुद्धा

तितकंच महत्त्वाच आहे.'

पत अस बोलल्यामुळे हे काम स्वीकारण्यावाचून मला गत्यतरच नव्हत आम्ही बोलत होतो तेव्हाच टी. टी. कृष्णम्माचारी आत आले. त्याच्या एकदर वागण्यावरून माझी वन् मॅन ट्रिब्युनलवरील नियुक्ती त्याना विशेषशी पसत दिसली नाही त्याना एक तर इन्क्वायरी आवडली नसावी अथवा मी ती चौकशी करावी हे त्यांना रुचल नसाव मी आयुर्विमा महामडळाची चौकशी चालू करायच्या आधी दोन महत्त्वाचे निर्णय घेतले. पहिला म्हणजे सरकारतर्फे त्या वेळचे अॅटर्नी जनरल श्री. सेटलवाड यानी काम बघाव. सरकारकडे मी काही एक पक्ष म्हणून बघत नव्हतो. पण सत्य शोधण्यात सरकारलाही तेवढाच रस असल्याने श्री. सेटलवाड याची पुष्कळच मदत झाली असती (आणि प्रत्यक्षात झालीही) आणि ही चौकशी जाहीर झाली पाहिजे चौकशीच स्वरूप गुप्त असता कामा नये हा माझा दुसरा निर्णय. एक तर चौकशीत काय चालू आहे हे लोकाना कळाव हा एक हेतू व दुसरा म्हणजे लोकाना याबद्दल काही माहिती द्यायची असल्यास ती त्याना देता यावी हा दुसरा हेतू.

माझे दोन्हीही हेतू अत्यत सफल झाले.

तस पाहिल तर ही चौकशी निव्वळ आर्थिक बाबीची होती. सेक्स, व्हायोलन्स वगैरे काही सनसनाटी गोष्टी त्यात नव्हत्या. तरीही या खटल्याविषयी जनसामान्यात जे औत्सुक्य जागृत झाल ते केवळ आश्चर्यकारकच होत. या आधी कुठल्याही कमिशनची वृत्तपत्रानी अथवा जनसामान्यानी एवढी दखल घेतली नव्हती. या चौकशीविषयी रकानेच्या रकाने भरून वृत्तपत्रात मजकूर येई. जिथे मी जाई तिथे याच चौकशीच्या अनुषगाने प्रश्नाचा माझ्यावर भडिमार होई. चव्हाणानी तर मला सागितल की, कलकत्त्यालासुद्धा लोकाना या चौकशीविषयी इतक औत्सुक्य होत की, सकाळची वृत्तपत्रे आल्यावर सगळ्या वृत्तपत्रावर झुबड उडायची व क्षणार्धात ती विकली जायची. लोकानी या चौकशीत इतका रस घेतला याबद्दल मला अभिमान वाटला. सगळ्यांनाच कळून चुकल होत की, सामाजिक नितिमत्तेच्या तत्त्वाशीच ह्या खटल्याचा सबध होता. या चौकशीने हेही दाखवून दिल की, आपल्या देशातली लोकशाही ही सच्ची आहे, तकलादू नाही. लोकाना कळून चुकल होत की, एक केंद्रीय मत्रीसुद्धा आज न्यायासनासमोर खेचला जात आहे. न्यायासनापेक्षा कोणीच श्रेष्ठ नाही. जनसामान्याच्या दृष्टीने या चौकशीच सर्वमान्य नाव म्हणजे मुदडा प्रकरण. या साऱ्या प्रकरणाला सुरुवात झाली ती अशी · दि. ४ सप्टेंबर १९५७ ला श्री. रामसुभगसिंग यानी वरकरणी एक अत्यत निरुपद्रवी वाटणारा प्रश्न लोकसभेत विचारला, 'एल. आय. सी. ने रु. तीन कोटी एका खासगी कपनीत गुतवले आहेत, असा आरोप स्टेट्समनने केला आहे, त्याबद्दल माननीय अर्थमत्री काही माहिती सागू शकतील काय ? ज्या कपनीत ही गुतवणूक केली आहे, तिचे नाव ? एकदर किती रक्कम त्या कपनीत गुतवली गेली आहे आणि या गुतवणुकीमागची कारणे?' असे तीन उपप्रश्नही वरील मुख्य प्रश्नाला जोडले होते

सी. डी. देशमुख जेव्हा केंद्रीय अर्थमत्री होते तेव्हा या लाईफ इन्शुरन्सचे त्यानीच राष्ट्रियीकरण केले होते आणि तेव्हापासून एक स्वायत्त सस्था म्हणून एल. आय. सी. काम करीत होती. त्यांच्याकडे तेव्हा प्रचंड पैसा होता व तो सगळा लोकांचाच होता. लोकांनीच त्याच्याकडे तो जमा केला होता. त्यामुळे त्याविषयी लोकाना माहिती मिळणे आवश्यकच होते

## प्रकरण का चिघळलं ? मुंदडा कोण ?

या साऱ्या प्रकरणात अत्यत दुर्दैवाची गोष्ट अशी की या वरील प्रश्नाला टी. टी कृष्णमाचारी यानी अत्यत सदिग्ध उत्तर दिलं. त्यावेळेला सारी माहिती त्याच्याकडे होती असही मला वाटत. यावेळीच जर त्यानी लोकसभेसमोर अत्यत मोकळेपणाने साऱ्या घटना माडल्या असत्या तर, मला नाही वाटत हे प्रकरण इतक विकोपाला गेल असत. तिथल्या तिथेच हे मिटल असत. फार तर थोडीफार यावर टीका झाली असती, पण थोडक्यातच सार मिटल असतं पण टी. टी. के केवळ कर्तबगार प्रशासकच नव्हते, तर थोडेफार अभिमानी व अहमन्यही होते. मला वाटत लोकसभेच्या सदस्याविषयी त्याच्या मनात एक सुप्त तुच्छतेची भावना असावी. त्यांना अस वाटायच की यापैकी फारच थोड्या सदस्याना आर्थिक प्रश्नातल कळत. अर्थकारणावर टी. टी. कॅ.च विलक्षण प्रभुत्त्व होत, त्यामुळे कुठे गुतवणुक केली कशी केली, हे या सर्व सदस्याना सागत बसण म्हणजे वेळेचा अपव्यय असही त्याना वाटल असण्याची शक्यता आहे पण त्याचबरोबर लोकसभेलाही स्वत ची अशी एक प्रतिष्ठा असते. लोकसभेला विश्वासात घेऊन जर कोणी काही चुका केल्या असतील तर अनेक वेळेला लोकसभा उदार मनाने त्याना क्षमा करते, पण लोकसभेला अधारात ठेवणं हे सदस्य कधीच सहन करीत नाहीत. माझ्या चौकशीत मला हे शोधून काढायच होत की मुदडा कपनीत एवढी प्रचड रक्कम का गुतवली गेली व यामागे नक्की व्यक्ती कोण होती, याला जबाबदार कोण होतं ? इथ मला थोडस मुदडा यांच्याविषयी सागायलाच हव हरिदास मुदडा हा एक अत्यत कुविख्यात फायनान्सर होता. अनेक ठिकाणचे करोडो रुपये अडकवून स्वत च आर्थिक साम्राज्य बळकट करायच हा एकच हेतू त्याच्या मनात सदैव असे जेव्हा मुदडा साक्षिदाराच्या पिंजऱ्यात आला तेव्हाच त्याच व्यक्तिमत्त्व मोठ रगतदार दिसल अत्यत कर्तबगार व विनोदी अस त्याच व्यक्तिमत्त्व. कुठलाही प्रश्न थोडासा अडचणीचा वाटल्यास ताबडतोब तो चुकवायची त्याची हातोटी मोठी विलक्षण होती. कुठल्याही प्रश्नाला बगल द्यायची त्याची क्षमता फारच मोठी होती. तर असे हे हरिदास मुदडा खटल्यातली एक प्रमुख व्यक्ती.

त्या वेळी एल. आय सी. बाबत एक धोरण अस होत की एखादी कपनी आर्थिक दृष्ट्या बळकट वाटली तर एल आय. सी.ने त्यात गुतवणूक करायला मागेपुढे पहायची जरूरी नव्हती. त्यामुळे मला दोन महत्त्वाच्या प्रश्नांची उत्तरं शोधायची होती. एक म्हणजे मुदडा कपनीतली गुतवणूक योग्य होती का ? व ती नक्की कोणाच्या आदेशावरून केली गेली होती अर्थमत्री त्याला जबाबदार होते की अर्थखात्याचे सचीव श्री. एच. एम. पटेल ? आणि इतर सर्व घटनात्मक तरतुदी यात पार पाडल्या गेल्या आहेत की नाही. या कमिशनची नियुक्ती दि. १७ जानेवारी १९५८ ला झाली आणि १० फेब्रुवारी १९५८ला मी आपला रिपोर्ट सही करून पाठविलासुद्धा. आत्तापर्यंत शंभर एक कमिशन्स नियुक्त केली गेली असतील

पण इतक्या कमी अवधीत निर्णय देणार हेच एक कमिशन होत या बद्दल मला अभिमान वाटला. जेव्हा चौकशीचे काम—साक्षीपुरावे व भाषणं सपली तेव्हा मी हायकोर्टात गेलो, इतर न्यायमूर्तीबरोबर चहा घेतला व माझा निर्णय मी डिक्टेट करायला सुरुवात केली. या निर्णयाला तव्वल एक बैठकी अडीच दिवस लागले. या साऱ्या चौकशीनतर मी खालील निर्ष्कषाप्रत आलो. एकतर हा सारा व्यवहारच सशयास्पद होता. जरी प्रत्यक्ष आदेश अर्थखात्याच्या सचिवानी दिला होता तरी याची जबाबदारी माझ्या मते अर्थमत्र्याकडेच होती. व गुतवणुकीपेक्षा मुदडाना मदत करण्याचाच हेतू त्यात जास्त उघड होता.

या चौकशीच्या सुनावणीच्या वेळेला टी. टी. के.ही साक्ष द्यायला आले होते. अत्यत हुशारीने व आत्मविश्वासाने त्यानी साक्ष दिली. पण मला वाटत परिस्थिती त्याच्या फारच विरूद्ध होती. मुदडा यानीही आपली साक्ष अस्खलितपणे दिली प्रसिद्धीच्या झोताला ते विलकूल घाबरले नाहीत वा बुझले नाहीत. आपल्यामुळे हा सारा घोळ चालला आहे त्याकडे त्याच सपूर्ण दुर्लक्ष होते. किंबहुना ते लक्षात असायच्याऐवजी आपल्यामुळे केवढी मोठी भानगड चालली आहे याचाच त्याना आनद वाटत असल्यासारखा दिसला.

*या चौकशीच्यावेळी तीन-चार महत्त्वाच्या घटना घडल्या.* टी. टी. के साक्षी देण्याकरता येणार इतक्यात सर जमशेट कागानी त्याना टी. टी. के.च प्रतिनिधित्व करावयास परवानगी द्यावी म्हणून माझ्याकडे अर्ज केला. अत्यत नम्रपणे मी कागाना विचारले, ' सर जमशेटजी साक्षिदाराना साक्षी देण्याकरता वकील कधीपासून मिळायला लागला ?' त्याची ती मागणी मी फेटाळून लावली.

दुसर म्हणजे माझा रिपोर्ट सील करून मी पाठविला इतक्यात फ्रँक मोराइस व फिरोझ गाधी एक महत्त्वाचा म्हणून पुरावा घेऊन आले मी त्याना सागितले की मी निर्णय दिला आहे. आता मी काहीच फेरबदल करू शकत नाही. अर्थातच त्यांची धावपळ फुकट गेली. मला वाटत त्यानी आणलेला पुरावा म्हणजे टी. टी. के. ना लोकसभेत उत्तर देण्याकरता तयार केलेली फाईल होती. ज्यात मुदडा प्रकरणाबद्दल पुष्कळच माहिती होती व ती टी. टी. कें. नी सभागृहासमोर सादर केली नाही.

### पं. नेहरूंची नाराजी

यावेळी आणखीही एक छोटीशी घटना घडली. आणि त्यामुळे माझ्यात व पं. नेहरू याच्यात सरळ सरळ सघर्ष उत्पन्न झाला. कर्तबगार व विद्वान लोकाबद्दल प नेहरूना नेहमीच आकर्षण व आदर असे. आणि या दोन्ही गोष्टी टी. टी. के. मध्ये होत्या. जर अशाप्रकारच्या नेत्यांची मोठी जरी चूक झाली असली तरी वरील गुणाच्या आकर्षणामुळे नेहरू नेहमीच त्याच्या चुकाकडे कानाडोळा करीत व टी. टी. के च्या बाबतीत देखील अगदी हेच झालं. मुदडा प्रकरणाला मिळालेल्या प्रचड प्रसिद्धीमुळे नेहरू अगोदरच पुष्कळ अस्वस्थ व भडकले होते व त्यातच एक घटना घडली. ही चौकशी चालू असताना अक्षरश. हजारो लोक सुनावणी ऐकायला गर्दी करायचे. एक दिवस तर ही गर्दी इतकी अनावर झाली की तेथे हजर असलेल्या पोलीस कमिशनरानी स्वत:च निर्णय घेऊन कौन्सील हॉलच्या आवारात लाऊड स्पीकर बसवला व त्या वरून सारी सुनावणी लोकांना ऐकवण्याची व्यवस्था केली. या विषयी मला मात्र काहीच माहीत नव्हती. पण सध्याकाळी जेव्हा मला हे कळलं तेव्हा मी पोलीस कमिशनराना ताबडतोब बोलावून घेतल, व माझ्या परवानगीवाचून लाऊड स्पीकर लावल्याबद्दल त्याना जाब विचारला. ज्याप्रमाणे या प्रकारच्या सुनावण्या गुप्तही असू नयेत त्याचप्रमाणे लाऊड स्पीकर लावायलाही सुनावणी म्हणजे काही तमाशा नव्हता. त्यानी माझी क्षमा मागितली व सागितल की हॉलच्या आवारातली गर्दी इतकी अनावर झाली होती की केवळ सार्वजनिक सुरक्षिततेच्या दृष्टिकोनातूनच आपण हे पाऊल उचलले होते. पण झाल्या घटनेबद्दल त्यानी पुन्हा पुन्हा क्षमा मागितली. मी त्याचे कारण ऐकून घेतले व तेवढ्यावरच शांत झालो. पण गोष्ट इथेच संपली नव्हती. मला वाटत त्याच दिवशी चौपाटीवर प. नेहरूची एक जाहीर सभा होती. त्यात त्यानी अस बोलून दाखवल की मी जणू काही मुद्दामच हॉलच्या आवारात लाऊडस्पीकर्स लावले होते. मी ताबडतोब दुसऱ्या दिवशी त्याना पत्र लिहिलं व खरी परिस्थिती विशद केली. त्यानीही मला लगेच कळवलं की त्याची टीका माझ्यावरती नसून लोकांवरती होती. पण त्याचदिवशी आणखी एक घटना घडली. इडीयन मर्चंटस चेंबरच्या सभेमध्ये त्यानी अगदी आऊट ऑफ द वे जाऊन टी. टी. कें. ची खास स्तुती केली व अप्रत्यक्षपणे त्यांची बाजू घेतली. मला वाटत की जेव्हा एखाद्या व्यक्तीची जाहीर चौकशी चालू असते त्यावेळी त्या बद्दल अस बोलण हे अप्रस्तुतच होय. पुढेही रिपोर्ट प्रसिद्ध झाल्यावर नेहरू उद्गारले की यात टी. टी. कें. चा काहीच हात नाही आणि टी. टी. कें.ना यातल काही माहीत सुद्धा नव्हत.

जेव्हा या मुदडा प्रकरणामुळे टी. टी. के.च्या राजिनाम्याचा प्रश्न निघाला तेव्हा नेहरूनी त्याला सक्त विरोध केला पण केवळ मौलाना अबूल कलम आझादांमुळे नेहरूना पडत घ्यावं लागल. मौलाना अबुल कलम आझादानी नेहरूना सागितल की ज्या मत्र्याच्या कारभारावर चौकशी मडळाने टीका केली आहे अशा मत्र्याला अधिकार पदावर ठेवण हा राष्ट्रीय पातळीवरचा भ्रष्टाचार ठरेल. त्यावेळी नेहरूना पडत घ्यावच लागल पण त्यामुळे नेहरू माझ्यावर भयकरच भडकले व माझ्याबद्दल सरळ नापसती व्यक्त करायला देखील त्यानी मागेपुढे पाहिल नाही. पण जेव्हा टी. टी. कें.ना राजिनामा द्यावाच लागला तेव्हा त्याना विमानतळावर पोचवायला खुद्द नेहरू गेले. व टी. टी. कें च्या घरापासून त्यांच्या बरोबर सामाजिक नीतिमत्तेचे जणू काही आपणच एकमेव वारसहार.आहोत या भावनेने श्री. कृष्णमेनन देखील विमानतळावर गेले. त्यानी जणू स्वत.चा टी. टी. कें. वरचा विश्वास प्रदर्शित केला.

पण या सगळ्या घटनांनी मी बिलकूल चिंतातूर झालो नाही. पतप्रधानाच्या मर्जीखातर काही मी न्यायदान केलेलं नव्हतं. मग माझ्या निर्णयाशी पतप्रधान सहमत असोत वा नसोत. पण माझी एक मात्र खात्री होती व मला आलेल्या असख्य पत्रानी ती दृढमूल केली ती म्हणजे न्यायदानाच काम मी अत्यत निर्भयपणे व नि:पक्षपातीपणे केल होतं.

¤

१९५८ मधल्या जुलैची एक सध्याकाळ. मी नेहमीप्रमाणे विलिंग्डन क्लबमध्ये ब्रिज खेळत बसलो होतो. इतक्यात राजभवनवरून

मला टेलिफोन आला व त्यामध्ये सांगण्यात आलं की, पंतप्रधानाना मला तातडीने भेटायच आहे. मी ताबडतोब राजभवनावर गेलो. मी पूर्वी लिहिल्याप्रमाणे टी. टी. के. प्रकरणामुळे माझे आणि नेहरूंचे सबध काही बरे नव्हते व बरेच दिवस आम्ही भेटलोही नव्हतो. पण त्यावेळी मात्र पडितजीनी मोठ्या प्रेमाने माझ स्वागत केल आणि म्हणाले, ' छगलाजी तुम्ही आतापर्यंत अनेक जज्मेंट्स दिली आहेत. आता राष्ट्राकरिता मला तुमची वेगळ्या कारणाकरता गरज भासत आहे. ' आणि पुढे म्हणाले ' अमेरिकेमधल्या राजदूताच्या जागेवर बरेच दिवस कोणीच नाही व राजदूताची ही जागा अत्यत महत्त्वाची आहे. तेव्हा ही जागा तुम्ही साभाळावी अशी माझी इच्छा आहे. ' मी सरन्यायाधीशपद सोडून ही राजदूताची जागा स्वीकारावी असा त्याचा आग्रह दिसला. मी थोडाफार चक्रावलोच. पण मी जे त्याना अगोदर सागितल होत ते आठवून जास्त काही बोललो नाही. पण फक्त कधी जाव लागेल हे विचारल, तर उत्तर आल– ' तत्काळ ! ' मी त्याना वचन दिलं की हायकोर्टातल्या माझ्या कामाची आवराआवर करतो व त्यानतर या नव्या कामगिरीकरिता सिद्ध होतो. अशा तऱ्हेने अमेरिका, मेक्सीको आणि क्यूबाचा राजदूत म्हणून माझी नेमणूक झाली जेव्हा माझी नेमणूक जाहीर झाली तेव्हा पार्लमेंटमध्ये पुष्कळच खळबळ माजली आणि अधिकारावर असलेल्या न्यायमूर्तींना राजदूत म्हणून नेमण्यात औचित्यभग होतो की काय या विषयीही विचारणा झाली या सगळ्यामुळे न्यायासनावर अनिष्ट प्रभाव तर पडणार नाही ना अशी शकाही व्यक्त करण्यात आली. यावर लोकसभेत गोविंद वल्लभ पतानी सागितल की, ' ही नेमणूक म्हणजे छगलाच्या चारिम्याची व कार्यक्षमतेची जणू ग्वाहीच आहे. छगलासारख्या निर्भीड माणसालाही जेव्हा सरकार या प्रकारच्या कामगिरीवर पाठवत तेव्हा त्याचा अर्थच हा की सरकारलाही या गुणाची कदर आहे. ' पण या सगळ्यात भयानक टीका झाली ती माझ्या अगदी जवळच्या मित्राकडून. श्री. सेटलवाड यानी स्वत.च आत्मचरित्रात लिहिल की, ' छगला राजकारणात शिरायला इतके उत्सुक होते की लॉ कमिशनच्या रिपोर्टवर सही करून त्याची शाई वाळायच्या आतच त्यानी आपल्या न्यायमूर्तीपदाचा राजिनामा दिला व अमेरिकेतल्या राजदूताची जागा स्वीकारली त्याची ही पुढे पुढे करण्याची वृत्ती आपल्या अनेक नेत्याप्रमाणेच आहे. ' सेटलवाड माझे अत्यत घनिष्ट मित्र. त्यामुळे मी ताबडतोब त्याच्याकडे गेलो व त्याच्या या लिहिण्याचा अर्थ काय म्हणून विचारले. मी त्याना म्हणालो की, ' मी तुमचा मित्र आहे अस तुम्हीही मानता. मग तुम्ही अस का लिहिलत ? ' यावर सेटलवाडच आश्चर्यचकित झाले व म्हणाले की, ' त्याच्या मते त्यांची माझ्यावरील टीका तशी थोडी सौम्यच आहे. ' १९४१ मध्ये माझी प्रॅक्टीस चागली असतानासुद्धा मी ती सोडली व देशाकरिता हायकोर्टाच्या सेवेत शिरलो. माझी पूर्वीची वृत्ती माहीत असतानासुद्धा सेटलवाड यानी अस लिहाव याचा मला खेद वाटला. त्यानी शब्द आणखी जरा काळजीपूर्वक वापरायला पाहिजे होते अस मला अजूनही वाटत.

१९४६ मधला युनोमधला थोडा काळ सोडला तर मला राजनीतीचा काहीच अनुभव नव्हता. माझ्या राजदूत म्हणून नेमणुकीबद्दल साधारणतः अमेरिकन वृत्तपत्रे अनुकूल होती. तिकडच्या काही वृत्तपत्राचे मथळे माझ्याकडे अजून आहेत.

' Nehru Picks up Muslim For Envoy to U. S. '

' India Selects Top jusist As New Ambassodor to U S. '

' Golf Playing Muslim ! ' India's Next Envoy. '

' India's Choice a Chief Justice. '

या गोल्फ खेळाबद्दल मला इथे थोड सागितलच पाहिजे. अमेरिकेत चित्रपटतारका, मोठे मोठे उद्योगपती हा खेळ अगदी भक्तीभावाने खेळतात. त्यामुळे तुम्ही जर गोल्फ खेळणारे नसाल तर समाजातल तुमच स्थानही काही खास अस राहात नाही. मीही मुबईत गोल्फ खेळत असे. पण त्यात निष्णात वगैरे काहीच नव्हतो. नुसतच शुष्कपणे चालण्यापेक्षा एका चेडूमागून चालण हे मला जास्त मानवणार होत त्यामुळे मुबईत पण मी गोल्फची प्रॅक्टीस चालू ठेवलीच होती. त्यामुळे जेव्हा अमेरिकेत मला गोल्फ खेळण्याकरिता आमत्रण दिल तेव्हा मी ते साफ नाकारल व त्याना सागितल की, ' राजदूत म्हणून माझ्या देशाची प्रतिष्ठा वाढवायला मी इथे आलो आहे. माझा गोल्फचा खेळ दाखवून देशाची प्रतिष्ठा कमी करायचा माझा मुळीच इरादा नाही. ' जेव्हा माझी नेमणूक झाली तेव्हा माझ्या वॉशिंग्टनच्या प्रेस अॅटॅचीने माझ्या खाण्यापिण्याबाबतच्या आवडीनिवडी विचारल्या. मी त्याला उलटपत्री लिहिले की ' जे जे म्हणून खाता येत असेल ते मी खाईन व जे जे म्हणून पिण्यासारख असेल ते मी पिईन. त्यामुळे कुठल्याही अमेरिकन माणसाला माझ स्वागत करायच असल्यास मुळीच अडचण येऊ नये... '

## अमेरिका आणि भारत

इथून अमेरिकेत जायच म्हणजे परग्रहावर जाण्यासारख आहे. दोन देशाच्या सस्कृत्या फारच भिन्न आहेत. तेथे जवळ जवळ साऱ्याकडेच अद्ययावत मशीन्स आहेत. अगदी वॉशीग मशीनपासून टेलिव्हिजन सेटस्पर्यंत. सारी काम तेथे यत्रावर चालतात अमेरिकन समाज हा प्रामुख्याने ग्राहक समाज आहे. पद्धतशीर विनाशावर त्याची अर्थ व्यवस्था अवलबून आहे. दर वर्षांनतर मोटार बदललीच पाहिजे. कुठलीही वस्तू टिकावू असूच शकत नाही. जर हे घडल नाही तर अमेरिकन अर्थव्यवस्था अक्षरश कोसळेल अधिक उत्पादन हे त्याच वेड. जास्ती, जास्ती, हा त्याचा नारा.

या अफाट लालसेबद्दल अनेक विचारवतानी इशारा दिलेला आहे. पण नाही, हा गुणधर्म अमेरिकन रक्तातच आहे अमेरिकन जीवनाचे दुसरे प्रमुख अग म्हणजे लोकमाध्यम यत्रणा वृत्तपत्रे, टेलिव्हिजन याना तेथे अतोनात महत्त्व आहे. अगदी अमेरिकन राष्ट्राध्यक्षाची निवडणूक जरी असली तरी त्याला या सर्व साधनाचा उपयोग करून घ्यावाच लागतो. आणि अमेरिकन लोकमत एखाद्याला अक्षरश. विकत घ्यावे लागते. आणि त्याची किंमत अगदी आपल्या कल्पनेबाहेरील असते एकदा सहज मी आमच्या अधिकारी वर्गाला सागितले की आपल्या चहाची आपण इथल्या टी. व्ही. वर जाहिरात करू या. पण त्यासाठी लागणारा खर्च ऐकल्यावर ती कल्पना मी क्षणार्धात सोडून दिली. अमेरिकेतली चारपाच वृत्तपत्रे अत्यत प्रभावी आहेत. एक चारपाच राष्ट्रीय वृत्तपत्रे सोडली तर बाकीच्याच्या बातम्या स्वत च्या गावापुरत्याच मर्यादित असतात.

अमेरिकेत सरकारी धोरणाचे वृत्तपत्र वगैरे भानगड नाही. प्रत्येक प्र श्नावर स्वतत्रपणे प्रत्येक वृत्तपत्र निर्णय घेत असते अमेरिकन वृत्तपत्राचे स्वातत्र्य खरोखरच अबाधीत व कौतुकास्पद आहे.

वॉल्टर लिपमन, जेम्स रस्टन यासारखे मान्यवर वृत्तपत्रकार तेथे आहेत ज्यांच्या लिखाणावरून सरकार अनेक वेळेला बोध घेते. मी वरती वृत्तपत्राच्या स्वातत्र्याबद्दल सागितले, त्याचे प्रत्यतर बागला देश युद्धात आलेच. या अमानवी हत्त्याकाडात अमेरिकेने त्याकडे केवळ काणाडोळाच केला नाही तर बगलादेशला दाबून ठेवण्यास पाकिस्तानशी सगनमत सुद्धा केले. पण तेथल्या वृत्तपत्रानी स्वत चे स्वातत्र्य सोडले नाही अत्यत नि पक्षपातीपणाने त्यानी या हत्त्याकाडावर व तद्नुषगाने अमेरिकन सरकारी धोरणावर कठोर हल्ले चढवले

अमेरिकेसारख्या महान देशाचे शासन मात्र मला पुष्कळ वेळेला अत्यत अकार्यक्षम वाटले. विशेषत परराष्ट्रीय धोरणाबाबत. ते नेहमीच राष्ट्राध्यक्षाची कचेरी, स्टेट डिपार्टमेंट व पेटॅगॉन मध्ये विभागलेले असे. आणि या तीनही सस्था एकाच प्रश्नावर अनेक वेळेला अगदी विरुद्ध विचार प्रकट करायचे. त्यामुळे धोरणाबाबत नेहमीचे अनिश्चितता आढळून यायची आणि नक्की धोरण काय हे जाणून घ्यायला राजदूताला पुष्कळच प्रयास करावे लागायचे.

वर्णसघर्ष हा अमेरिकेतला एक मोठा प्रश्न आहे. माझ्या मते त्याला जवळजवळ उत्तर नाही. सरकार जरी या प्रश्नाबाबत पुष्कळ आस्था बाळगीत असले तरी विशेष असे काही घडत नाही. एखाद्या गोऱ्या व्यक्तीच्या थिएटरमध्ये निग्रोना मज्जाव असे. एखादा निग्रो तिकीट घ्यायला गेला व काऊटरवरती जर एखादा गोरा असला तर काळा हात बघून तत्काळ तिकिटे सपली म्हणून गोरा सागत असे. कॉस्मॉपॉलिटन क्लब हा अमेरिकेतला मान्यवर क्लब आणि देशोदेशीच्या राजदूताना ते माननीय सदस्य म्हणून मानाने बोलवायचे. पण कृष्णवर्णीय राजदूत मात्र यातून हमखास गाळले जायचे. याविरुद्ध अध्यक्ष केनेडीनी त्याना सागितले की, 'जर कृष्णवर्णीय राजदूताना तेथे मज्जाव असेल तर स्वत. केनडीनाही त्या सस्थेचे सदस्य रहाण्यात आस्था वाटणार नाही. केनेडीनी त्या क्लबचे सदस्यत्व सोडले पण त्या क्लबने मात्र आपले धोरण काही बदलले नाही.

सहानुभूती व औदार्य हा अमेरिकन जनमानसाचा आणखी एक विशेष गुणधर्म आहे.

जगाच्या कानाकोपऱ्यात कुठेही दुर्घटना होवो, ताबडतोब अमेरिकन माणसे कमिटी स्थापन करतील व त्या दुर्दैवी लोकाकरता सर्व प्रकारची मदत गोळा करतील

त्याच्या समाजातली श्रमप्रतिष्ठेची किंमत खरोखर स्पृहणीय आहे. त्याना ठाऊक असते की अगदी लॉगकेबीन मध्ये रहाणारा सुद्धा अमेरिकेचा राष्ट्राध्यक्ष होतो. आणि तशी उदाहरणे देखील अमेरिकन इतिहासात सहज सापडतात.

माझी नेमणूक झाल्यावर पहिले काम मला करायचे होते ते म्हणजे माझी ओळखपत्रे अमेरिकेच्या राष्ट्राध्यक्षाना सादर करणे. मी मोठ्या औपचारिक समारभाची वाट बघत होतो. पण राष्ट्राध्यक्षाच्या कचेरीतर्फे मला सागण्यात आले की राष्ट्राध्यक्ष आयसेनहॉवर साध्या लाऊंज सूटमधे असतील तर मीही लाऊंज सूट मध्येच यावे. फक्त राष्ट्राध्यक्षाकडून मला खास गाडी पाठवण्यात आली हाच काय तो समारभ त्यामुळे मीही आधी ठरवल्याप्रमाणे अचकन व चुडीदारच्या ऐवजी लाऊज सूटमध्येच गेलो व औपचारिकरित्या ओळखपत्रे दाखवल्यावर लगेच हा समारभ सपला. या उलट लडनला जेव्हा मी हायकमिशनर म्हणून गेलो तेव्हाचा तो समारभ अजून माझ्या पुरता लक्षात आहे. राणीने आल्यानतर बरोबर किती पावले मी पुढे यायचे त्यानंतर मी कसे उभे रहायचे. बापरे हजारो गोष्टी त्याठिकाणी पाळाव्या लागल्या. त्याआधी बकिंगहॅम पॅलेसला जाताना ती खास काचेची घोड्याची गाडी, अनेक माणसे रस्त्यावर स्वागताला उभी, सारे कसे वेगळेच असायचे

राजदूत म्हणून माझ्या कारकीर्दीत मी स्पष्टवक्तेपणावर जास्त भर दिला होता. मला वाटायच की भारतापाशी लपवण्यासारखं काहीच नव्हत, त्यामुळे माझ्या या वर्षाच्या कारकिर्दीत अमेरिकन वृत्तपत्रे व वार्ताहाराबरोबर माझ चागलच जमल. एकदाही अस झालेल मला आठवत नाही की वार्ताहर एखाद्या महत्त्वाच्या घटनेच्या अनुषगाने मला भेटायला आले आहेत आणि 'नो कॉमेंट' म्हणून मी त्याना परत पाठवल आहे. आपली सीक्रेटस सोडून जेवढ म्हणून काही सागता येईल तितक मी सदैव खुलेपणाने सागत असे.

## दोन राष्ट्राध्यक्षांचा काळ

आयसेनहॉवर आणि केनडी या दोघाच्याही कारकीर्दीत राजदूत म्हणून काम करायला मला सधी मिळाली हे मी माझ भाग्य समजतो. दोघाच्याही वेळेला प्रश्न वेगळे होते, प्रश्नाकडे बघण्याचे दृष्टिकोन देखील वेगळे होते. एखादा भूकप घडून सार कस बदलून जाव तस आयसेनहॉवरपासून केनेडी या बदलामुळे अमेरिकेत घडून आल. आणि केनेडीच्या उदयाने जणू काही एखाद नवीनच राष्ट्र उदयाला आल!

आयसेनहॉवर हे एक अत्यत चागले गृहस्थ होते यात शकाच नाही. शाततेच्या धोरणावरती आपल्या व्यक्तित्त्वाचा ठसा उमटावा, सोव्हिएट रशियाशी मैत्रीपूर्ण सबध ठेवावेत, अस त्यांना नेहमी वाटायच. ते 'मित्र' राष्ट्राच्या फौजाचे 'कमाडर इन चीफ' असल्याकारणाने युद्ध व त्याचे विघातक परिणाम म्हणजे काय हे त्याना पूर्णपणे ज्ञात होते. त्यामुळे ते शाततेचे खरोखरच भोक्ते होते. पण दुर्दैवाने ते राष्ट्राध्यक्ष म्हणून अत्यत अपरिणामकारक ठरले. युद्धातल्या विजयामुळे ते अमेरिकेत प्रचड लोकप्रिय ठरले. पण ते डलेस याच्या पूर्णपणे आहारी गेले होते.

जॉन फॉस्टर डलेस याचा भारतविद्वेष तर सर्वख्यातच आहे. आयुष्यातल त्याच एक प्रमुख सूत्र म्हणजे कम्युनिझमला विरोध. मग तो कुठल्याही स्वरुपात पुढे येवो. भारताने त्याच्या मिलिटरी कपूत जायच नाकारल्यामुळ त्याच्या मनात भारताविषयी एकप्रकारची अढीच उत्पन्न झाली होती. भारताच्या तटस्थतेविषयी बोलताना ते नेहमी म्हणायचे की भारताची तटस्थता योग्य व अयोग्य मधली तटस्थता आहे. त्यामुळे सहाजिकच ती अनैतिक तटस्थता आहे. अमेरिकन धोरण वा अमेरिकन जीवनपद्धती म्हणजे जगातली सर्वात श्रेष्ठ पद्धती हे मूलसूत्र त्याच्या मनात सदैव ठसलेले असे हे मुद्दाम सागायलाच नको. तर आयसेनहॉवर अशा या

डलेसच्या प्रभावाखाली सदैव राहिले. डलेसवरील पूर्ण विश्वास हे आयसेनहॉवर यांचे प्रमुख सूत्र.

पण व्यक्तिश. आयसेनहॉवर अत्यत साधे व सरळ गृहस्थ होते. त्यामुळे वैयक्तिक दृष्टिकोनातून ते सदैव शाततेकरता झटत राहिले. त्यामुळे तर त्यांची भारत भेट अत्यत यशस्वी ठरली. अनेक भारतीयाच्या मनात त्यानी स्वत.च अस खास स्थान निर्माण केल. सहानुभूतीच्या तारा छेडून त्यानी अनेक भारतीयाची मनं जिंकली.

## आयसेनहॉवरची भारत भेट

आयसेनहॉवर भारताला भेट द्यायच्या अगोदर इतर अनेक देशाना भेटी देणार होते. त्यामुळे त्याना मी विमानतळावर निरोप दिला व नतर मी भारतात आलो. त्याच्या स्वागताच्या दिवशी प्रोटोकल व सुरक्षितता या दोन गोष्टी व्यवस्थेच्या दृष्टीने अत्यत कठीण वाटल्या. त्याच्या स्वागताकरता मी किती वाजता निघायच हेही प्रोटोकल डिपार्टमेंटन मला सागितल होत. त्यामुळे ठीक अर्धा तास अगोदर मी विमानतळावर जायला निघालो. पण तो प्रचड जमाव व ट्रॅफीक जाम पाहिला व मनोमन हवकलोच. पण कसातरी मी विमानतळावर पोहचलो व बघतो तो काय राष्ट्राध्यक्ष वा पतप्रधान कोणीच विमानतळावर पोहोचले नव्हते. सगळेच गर्दीत अडकले होते. काबूलहून आयसेनहॉवर येणार होते. त्याच्या या ऐतिहासीक भेटीच्या वेळेला फक्त राजदूतच विमानतळावर हजर या कल्पनेने मला दरदरून घाम सुटला. पण तेवढयात मी सुटकेचा निश्वास सोडला. पतप्रधान व राष्ट्रपती दोघेही येत होते. अमेरिकन राजदूताला देखील या गर्दीतून वेळेवर पोहोचण अशक्य झाल होत. दैवान खैर केली आणि आयसेनहॉवर याच विमान उशिरा आल. त्यानतर पुढे कधीतरी आयसेनहॉवर यानी मला सागितल की त्याच्या या दौऱ्यात भारत सोडून इतर सर्व ठिकाणी ते अगदी वेळेवर पोहोचले होते. फक्त भारतातच त्याच विमान उशिरा आल होत. मनातल्या मनात मी या घटनेच केवढ स्वागत केल.

दिल्लीने आयसेनहॉवरना फारच प्रभावित केलं. राष्ट्रपतीभवनावर तर ते निहायत खूश होते ते एकदा म्हणालेही, 'तुमच्या या राष्ट्रपतीभवनाच्या मानाने आमच व्हाइट हाउस किती लहान आहे.' मोठ्या मुत्सद्देगिरीने मीसुद्धा उत्तर दिलं, 'पण व्हाइट हाऊससुद्धा एक ऐतिहासिक वास्तू आहे.'

त्याचप्रमाणे राष्ट्रपती श्री. राधाकृष्णन यानी लोकसभा व राज्यसभाच्या सयुक्त बैठकीच्यावेळी जे भाषण केलं त्यानीही आयसेनहॉवर फारच प्रभावित झाले. राधाकृष्णन आपल्या नेहमीच्या तत्त्ववेत्याच्या शैलीने मोठ्या अस्खलितपणे भाषण करीत होते. हातात एकसुद्धा कागदाचा कपटा नव्हता. या त्याच्या गुणावर आयसेनहॉवर फारच प्रभावित झालेले दिसले.

आयसेनहॉवर याच्या सत्कारसमारंभप्रसगी उत्पन्न झालेला एक नाजूक प्रसंग म्हणजे त्या प्रसगी कुठल मद्य असाव या प्रश्नावरून झालेली चर्चा. प्रेटोकल खात्यान मला सागितल की त्याच्या खान्याच्या वेळी सौम्य मद्य असेल पण व्हिस्की असणार नाही. कारण पडितजीना त्याचा भयानक तिटकारा होता. किंबहुना त्याना व्हिस्की म्हणजे विघटित सस्कृतीच प्रतीकच वाटायच. इतर सौम्य मद्याना मात्र त्याचा विरोध नव्हता. पण अमेरिकन लोकाच्या खान्यात व्हिस्की नाही ही कल्पनाच मला करवत नव्हती. अमेरिका आणि व्हिस्की हे समीकरण अगदी पक्कं आहे. त्यामुळे आयसेनहॉवरना व्हिस्की मिळणार नाही ही कल्पना काही मला बरी वाटेना. त्याप्रमाणे मी प्रोटोकल खात्याला कळवले. मला वाटतं मोठ्या मिनतवारीनंतर पडितजीनी व्हिस्कीसाठी परवानगी दिली. त्यानतर खान्याच्या वेळी व्हिस्कीचे नुसते पाट वहात होते हे सांगायला नकोच.

आयसेनहॉवर याचे इतर काही कार्यक्रम मी सागत बसत नाही. पण एक मात्र नक्की त्याच्या भारतातल्या अभूतपूर्व स्वागताने त्याची भारतभेट मोठी यशस्वी ठरली.

## इंडियन लीगमधील भाषण

माझ्या अमेरिकेतल्या कारकीर्दीकडे वळताना मला माझ इंडियन लीग ऑफ अमेरिका या सस्थेतील भाषण आठवत. यावेळी मला काही विचार व्यक्त करता येतील अस वाटलं व त्या सधीचा मी पुरेपूर फायदा घेतला. त्यावेळी अमेरिकेत असणाऱ्या भारतविषयक मैत्रीपूर्ण वातावरणाच मी स्वागत केल व सागितल की, 'या दोन देशाच्या सबधात पूर्वी कधीतरी मतभेद आले असतील व पुढेही ते येतील पण महत्त्वाच्या व मूलभूत प्रश्नाविषयी जो काही राष्ट्राचा दृष्टीकोण असतो तो दृष्टीकोण भारत व अमेरिका यामध्ये नेहमीच समान राहिला आहे. राष्ट्रामधली मैत्री ही तपशिलावर अवलंबून नसून, मूलभूत प्रश्नाविषयी असणाऱ्या दृष्टिकोणावर अवलबून असते.' त्यानतर भारतावर होणाऱ्या टीकेचा मी जरा समाचार घेतला. मी म्हणालो की, 'भारतावरती नेहमी तटस्थ राष्ट्र म्हणून टीका होते. पण शातता प्रश्नाविषयी मात्र भारत तटस्थ नसून नेहमीच अत्यत प्रयत्नशील आहे. मानवी स्वातत्र्याच्या प्रश्नाला देखील भारताने वाहून घेतले आहे.' त्याचवेळी अमेरिकन परराष्ट्रीय धोरणावर देखील मी टीका केली. मिलटरी कपूच्या अनुरोधाने असलेल्या अमेरिकन दृष्टिकोणाचा मी चांगलाच समाचार घेतला. मी शेवटी म्हणालो की, 'लोकशाही पद्धतीने राष्ट्रउभारण्याच्या कार्याला आम्ही लागलो आहोत. चीन व रशिया यांचा विश्वास आहे की कम्युनिझमच्या व्यतिरिक्त राष्ट्रउभारणी होऊच शकत नाही. पण त्यातच हजारो माणसे कामाला येतात जो कम्युनिझमचा अटळ परिणाम असतो. आम्हाला त्याचा दृष्टिकोण खोटा पाडायचा आहे. त्यामुळे भारताच्या या महान प्रयत्नाला जर अमेरिकन लोकाचा पाठिंबा मिळाला नाही तर पूर्वेतली लोकशाही अस्तगत होईल व लाखो लोकाची या लोकशाहीवरील श्रद्धा उडेल. गरीब विकसनशील राष्ट्रातदेखील लोकशाही यशस्वी करता येते हे दाखविण्यासाठी अमेरिकेच्या मदतीची आम्हाला गरज आहे.'

आयसेनहॉवर याच्या कारकीर्दीत निक्सन उपराष्ट्राध्यक्ष होते. काही वेळेला मी त्याना भेटलोही. बघताक्षणीच मला निक्सन काही आवडले नाहीत. अर्थात मी त्याना तस भासू दिल नाही. कारण, राष्ट्रासाठी राजदूताने आपल्या भावना नेहमीच सयमित ठेवायच्या असतात. पण जी एक तळमळ लागते ती त्याच्यात होती अस वाटत नाही. तसे ते फारच स्वयकेंद्रित वृत्तीचे वाटायचे.

त्याचवेळी माझी आणि केनडीची चागली मैत्री जमली. ते व शेरमन कूपर सिनेटमध्ये नेहमीच भारतीय दृष्टिकोन उचलून धरायचे. भारताचे ते खदे पाठिराखे होते. हाऊस ऑफ रिप्रेझेन्टेटिव्हजमध्ये तेच काम चेस्टर बौल्स करायचे.

त्यावेळी एका बाबतीत मी जरा वेगळा मार्ग अनुसरला. इतके दिवस आम्ही फक्त जे भारताचे मित्र होते त्याच्याशीच अमेरिकेत सपर्क ठेवून होतो पण मी निर्णय घेतला की आपले जे विरोधक आहेत त्याच्याशी आपले सबध प्रस्थापित केले पाहिजेत व आपल्या विरोधकाकडेही दुर्लक्ष करता कामा नये.

मला तेथे आढळलं की वॉशिंग्टन पोस्ट व इतर काही वृत्तपत्रे वगळता एकूण सर्व वृत्तपत्राचा दृष्टिकोण आपल्या विरुद्ध होता. न्यूयॉर्क टाइम्सच्या बाबतीत हे प्रकर्षाने जाणवायच. त्याच्या सपादक वर्गाबरोबर मी एक खाना आयोजित केला होता. अत्यत रगतदार अशी चर्चा झाली. त्यानी नेहमीचेच मुद्दे उगाळले. मी पण माझ्या बाजूने त्याला उत्तरं दिली. पण आमची चर्चा सपल्यावर मला अस आढळून आल की आमच्यात जास्त सामजस्य निर्माण झाल होतं.

राजनैतिक वर्तुळात स्वीडनच्या गुन्नर जारीग बरोबर माझी चागली मैत्री जमली. प्रथमदर्शनी छाप पाडणारे वगैरे ते काही नव्हते, पण काही काळानतर त्याच्यामधल्या गुणानी तुमच्यावर प्रभाव पडायला सुरुवात व्हायची.

इराणचा राजदूत हा इराणच्या शहाचा जावईच होता तो प्रत्येक प्रश्नावरती मी ज्येष्ठ म्हणून माझ्याशी विचार विनिमय करीत असे.

## केनेडींची कारकिर्द

सिलोनचे गुणवर्धने हे कृष्णमेनन याच्याबद्दल काही गमतीशीर गोष्टी सागायचे. त्यानी सागितलं की युनोमधला आफ्रो एशिअन ग्रुप हा एकवेळ अत्यत शक्तीमान होता पण कृष्णमेनन यांच्यामुळे त्याच विभाजन झाल आणि म्हणून महत्त्व कमी झालं. आफ्रो एशिअन ग्रुपच्या नेत्यासमोर कृष्णमेनन त्याना अगदी शाळेतली मुल समजून भाषण करायचे व राजनैतिक घडामोडीवर व्याख्यान सुनवायचे. अर्थात तेथे जमलेल्या सगळ्या लोकापेक्षा कृष्णमेनन हुशार व कर्तबगार होते यात शकाच नाही. पण ज्या पद्धतीने ते इतरांना वागवायचे त्यामुळे इतरांना साहाजिकच राग यायचा.

केनेडी सत्तेवर आल्यानतर जो बदल झाला तो अगदी जाणवणारा होता. लोकांना तर एका नव्या युगाची पहाटच होत आहे अस वाटल. केनडीपाशी प्रभावी व्यक्तीमत्त्व होतं, धडाडी होती, विचार होते, तळमळ होती व विचार प्रत्यक्षात आणण्याची कुवत होती. केनेडी राष्ट्राध्यक्ष झाल्याने अमेरिकन जीवनश्रद्धा, जीवनपद्धती नक्कीच उचावली जाणार अस लोक म्हणू लागले. हार्वर्ड मधल्या काही बुद्धीमान माणसाना त्यानी सल्लागार म्हणून नेमल एकदरच वातावरणात त्यानी चैतन्य आणल.

केनेडी निवडून यायच्या आधीच हवेत उत्साह संचारला होता. एक वेगळच वार वहात होत. केनेडी व निक्सन याच्यामध्ये टी. व्ही. वरचे वादविवाद व्हायचे. याच्या आधी केनेडी निक्सन एवढे काही प्रसिद्ध नव्हते. पण एकदा का त्या प्रश्न्यात वादविवादाना सुरुवात झाली की बघणाऱ्याला क्षणार्धात कळून चुकत असे की सरस कोण आहे. राष्ट्रीय महत्त्वाच्या प्रश्नावर ते दोघ बोलत व स्वत.ची मते माडीत. मला वाटत या वादविवादात भाग घेऊन निक्सन यानी स्वत.च्या पायावर धोडा पाडून घेतला.

केनेडी राष्ट्राध्यक्ष झाल्यानतर ते भारताविषयी सदैव चांगलेच बोलत असत. नेहरूविषयी त्याना फार आदर होता. मला वाटतं त्यांनी पहिल्या अध्यक्षीय भाषणात नेहरूंची काही वचने देखील उद्धृत केली. विचारवताविषयी केनेडीना फार आदर होता व नेहरूना जगातल्या काही महान नेत्यापैकी एक म्हणून मानायचे.

केनेडी राष्ट्राध्यक्ष व्हायच्या आधी मला अमेरिकेत सत्यजित रे यांच्या सिनेमाचा एक महोत्सव करायचा होता व त्याच अध्यक्ष-स्थान केनेडीनी स्वीकाराव असं मला वाटत होत. त्यानुसार मी त्याना पत्र लिहिल, त्यात मी लिहिलं की, 'भावी अध्यक्ष म्हणून नव्हे तर कलेचा भोक्ता व आश्रयदाता म्हणून' तुम्ही या महोत्सवाच उद्घाटन कराव. त्यात भारत व भारतीय कला याचा सन्मान झाल्यासारखा मला वाटेल. त्याला त्यांनी अत्यत एक गमतीशीर उत्तर पाठवलं. त्यात त्यानी लिहिलं होत 'मी राष्ट्राध्यक्ष म्हणून निवडून येईन याची बहुधा तुम्हाला खात्री दिसते. पण राष्ट्राध्यक्ष म्हणून नव्हे तर व्यक्ती म्हणून तुम्ही मला बोलवीत आहात तर हे आमत्रण मी जरूर स्वीकारीन.'

दिलेल्या वचनाला जागून राष्ट्राध्यक्ष झाल्यावर अगदी लगेच त्यानी या समारभाचं आमत्रण स्वीकारल. व ते फिल्म महोत्सवाच्या उद्घाटनला आले. माझे इतर सारे राजदूत सहकारी या माझ्या यशावर थोडेसे आश्चर्यचकितच झाले. महोत्सवातल्या एका सिनेमातला प्रसग मला व्यवस्थित आठवतो. रे च्या सिनेमातला नायक ग्रॅज्युएट होऊन नोकरी शोधण्याकरता कलकत्त्याला येतो व ७० रु. पगाराची नोकरी स्वीकारतो. हळूच केनेडीनी मला विचारल ७० रु म्हणजे किती? मी डॉलर्समध्ये त्याना सागितलं तर ते आश्चर्यचकितच झाले. एक ग्रॅज्युएट महिना १५–१६ डॉलर्सवर गुजराण करू शकतो? मी सागितल की यावरून दारिद्र्याचा प्रश्न आमच्याकडे किती प्रचड आहे हे तुम्हाला कळू शकेल. दुसरा लक्षात रहाण्यासारखा समारभ म्हणजे, गॅलब्रेथ याची भारताचे राजदूत म्हणून नेमणूक झाली तेव्हाचा. त्यावेळी डीन रस्क यांनी अत्यत अनपेक्षितरित्या मलाही बोलायला सागितल. मला तशी उत्स्फूर्त बोलायची सवय होती पण अशा महत्त्वाच्या प्रसगी बोलायचं म्हणजे जरा कठीणच ऑस्कर वाईल्डने म्हटल्याप्रमाणे सगळ्यात गाजलेली उत्स्फूर्त भाषण ही अत्यत काळजीपूर्वक तयार केलेली असतात. तरीही मी समयोचित अस भाषण केल.

गॅलब्रेथ हे अत्यत चटकदार गृहस्थ आहेत. केनेडीना गॅलब्रेथ याच्याविषयी प्रकाड आदर होता. केनेडीनी गॅलब्रेथ यांना विचारले, 'माझ्या सरकारात कुठल स्थान तुम्हाला भूषवायला आवडेल. तर गॅलब्रेथ यांनी सागितल की मला फक्त भारतात राजदूत म्हणून जायला आवडेल.' भारताचा हा एका अर्थाने गौरवच होता.

त्या वेळी क्यूबाच्या फिडेल कॅस्ट्रोच अमेरिकेतल स्वागतदेखील मला चागलच आठवत. त्याच स्वागत करायला आम्ही सगळे उभे होतो. कॅस्ट्रो सगळ्याशी औपचारिकपणे हस्तादोलन करीत होते. माझ्यापाशी आल्यावर भारताचा राजदूत म्हटल्यावर ते क्षणभर थबकले व दोन-तीन मिनिटे थाबून बोलले. त्यानी नेहरूची चौकशी केली व नेहरूविषयी अत्यत आदराने बोलले.

मी वॉशिंग्टनला असताना नेहरू यूनोच्या बैठकीकरता न्यूयॉर्कला आले होते. त्याच्याबरोबर कृष्णमेनन होते. युनोबाबतच्या सगळ्या प्रश्नाबाबत नेहरू कृष्णमेनन याच्या पूर्ण वर्चस्वाखाली होते. कृष्ण-

मेनन यांनी व्यक्त केलेल्या मताव्यतिरिक्त दुसर काही मत असू शकत हे त्यांना पटायचच नाही.

ते यूनोच सेशन अत्यत गाजल. याच सेशनमध्ये क्रुश्चेव्ह यानी भर आमसभेत जोडा उगारला.

१५ जून १९५० ला मी नेहरूना पत्र लिहिलं व या पदावरून निवृत्त होण्याची अनुमती मागितली. माझ्या अमेरिकेतल्या कार्याचा मी त्याना आढावा दिला. नेहरूनीही मला एक पत्र पाठवलं व माझ्या कामगिरीचा गौरव केला.

जेव्हा अमेरिका सोडायच माझं नक्की झाल त्या वेळी मी केनेडीना भेटायला गेलो. केनेडी स्वत.च्या ऑफीसमधून बाहेर आले व त्यानी माझ स्वागत केल. सहसा अशा प्रसगी सहसचीव हजर असतात. पण त्या वेळी केनेडी व मी यांच्या व्यतिरिक्त दुसर कोणीही नव्हत. तब्बल ४५ मिनिटे आमच्या गप्पा चालल्या होत्या. चीन प्रश्नावरून बोलताना ते म्हणाले की, ‘सारी दक्षिण पूर्व राष्ट्रे चिनी प्रश्नावरून भारताकडे नेतृत्त्वाच्या आशेने बघत आहेत. या वेळी भारताने नेतृत्त्व स्वीकारायलाच पाहिजे. ती भारताची नैतिक व ऐतिहासिक जबाबदारी आहे. भौगोलिक दृष्टिकोनातूनदेखील भारताने चीनला आता पायबद घालायची जरूर आहे. साऱ्या त्रयस्थ दृष्टिकोनाच्या राष्ट्रानी आता एक होऊन चीनला पायबद घालणे आवश्यक आहे.’ त्यावर मी म्हणालो की, ‘थायलड वगैरेसारख्या राष्ट्राच काय ? कारण मिलिटरी करारानी ते अमेरिकेशी बाधले गेले आहेत.’ त्यावर केनेडी म्हणाले की, ‘जर भारत या प्रश्नावर गभीरपणे विचार करणार असेल तर थायलडच्या कराराचा ते पुनर्विचार करायलादेखील तयार आहेत.’ ते अत्यत तळमळीने बोलत होते.

मी भारतात आल्यावर हे नेहरूना सागितल. नेहरू म्हणाले की, ‘केनेडीची ही सूचना म्हणजे आपण सर्वांनी मिळून सैनिकी करार करण्यापैकी आहे व सैनिकी कराराच्या मी सदैव विरुद्ध आहे, कारण त्याने उगाचच तणाव वाढतात व येथे तर ही आपली चाल चीन विरोधी ठरेल. यामुळे काही हेतू साध्य होणार नाही की शांतता प्रस्थापित होणार नाही.’ एकदरीत या केनेडीच्या सूचनेला नेहरूनी फारसा काही प्रतिसाद दिला नाही.

अमेरिका सोडायच्या आधी मी एक मुलाखत दिली. त्यात मी म्हणालो, ‘मी यायच्या आधी भारताच्या अलिप्ततेच्या धोरणाविषयी अमेरिकेत बरेच गैरसमज होते. आज आमच धोरण आदराला पात्र झाल आहे. आता बदल इतका झाला आहे की, खुद्द अमेरिकेलाच आफ्रिकेत वगैरे अलिप्त राष्ट्र अधिक आवडतील. भारताच्या आर्थिक प्रश्नाकडे पण अमेरिका अधिक जागरुकतेने पाहू लागली आहे. २२२५ कोटी डॉलर्सची वाढलेली भारताची आर्थिक मदत अमेरिकेचा भारतावरचा विश्वास प्रदर्शित करते. मला वाटत, या दोन वर्षांत भारत आणि अमेरिका एकमेकांच्या पुष्कळच जवळ आले आहेत. दोन्ही देशांमधल सामजस्य आता पुष्कळच वाढल आहे.’

माझ्या अमेरिकेतल्या कारकीर्दीविषयी लिहिताना श्री. दुर्गादास यांनी त्याच्या पुस्तकात लिहिल आहे की, मी अमेरिकेत राजदूत असताना प्रतिष्ठेच्या कल्पनेवर उगीचच उभा राहिलो व अमेरिकन लोकानी माझ्याकडे याव हा आग्रह धरला. प्रसिद्धी मिळावी म्हणून पाकिस्तानविरोधी भाषण केली. या डायरीइस्ट लोकाना नाहीतरी प्रसग अतिरजित करण्याची सवयच असते. राजदूताची जबाबदारी कशी असते हे मी यापूर्वीच सागितल आहे. अत्यत कठीण अशी तारेवरची कसरत त्याला सदैव करावी लागते. सतत त्याला काळजीपूर्वकपणे बोलायला व वागायला लागत. पण प्रतिष्ठेच्या कल्पना व अमेरिकन लोकानी मला भेटायला याव या आग्रहाविषयी त्यानी जे लिहिल त्यात सत्याचा काहीच अश नाही. देशाच्या एका टोकापासून ते दुसऱ्या टोकापर्यंत मी प्रवास केला. भारत व भारतविषयक धोरणाचा सतत पाठपुरावा केला. अमेरिकन लोकानी माझी इतकी भाषण ऐकली असतील की, त्याला ते एखादेवेळी कटाळले देखील असतील.

मला वाटतं, दुर्गादास याना स्टेट डिपार्टमेंटमधल्या कुठल्यातरी दुय्यम अधिकाऱ्याने काहीतरी सागितल असाव. अमेरिकेत असताना मी या दुय्यम अधिकाऱ्याशी कधी फारसा सपर्क ठेवून नव्हतो, ही गोष्ट तितकीच खरी आहे. मी फक्त सेक्रेटरी ऑफ स्टेट व असिस्टट सेक्रेटरी यांच्याशीच सपर्क ठेवून होतो. मला वाटत, राजदूताच्या प्रतिष्ठेला मी दुय्यम अधिकाऱ्याशी जास्त सपर्क ठेवण शोभलही नसतं. बरं, पाकविषयी अमेरिकेची भूमिका कशी चुकीची आहे हे अमेरिकेला दाखवण तर माझ कामच होत व त्यामुळे भारतात मला प्रसिद्धी मिळाली असेल तर लोकाना आपला राजदूत अमेरिकेत काय करतोय हे जाणून घ्यायच्या जिज्ञासेमुळेच.

## माझी मेक्सिको भेट

मी ज्यावेळी अमेरिकेला राजदूत होतो त्याचवेळी मी क्यूबा व मेक्सिकोलाही राजदूत म्हणून होतो. मेक्सिको समुद्रसपाटीपासून ८००० फूट उचीवर आहे. त्यामुळे कुठल्याही नवख्याला तो तेथे आला की चोवीस तास विश्राती घ्यायचा सल्ला देण्यात येतो. मी तो कधीच मानला नाही. मेक्सिकोमध्ये अनेक जाती-जमाती इतक्या गुण्यागोविंदाने नादतात की ते पाहून आश्चर्यचकीत व्हायला होत तेथे शुद्ध स्पॅनीआर्डस आहेत. तेथे भिन्न लोक पण आहेत व शुद्ध इडियन लोकही आहेत. पण ह्या तीनही जमाती इतक्या सलोख्याने रहातात की ते बघून आजकालच्या दिवसात अस काही घडू शकेल यावर विश्वासच बसत नाही.

मेक्सिकोची युनिव्हर्सिटी अत्यत प्रेक्षणीय आहे. ही युनिव्हर्सिटी लॉटरी तिकिटाच्या विक्रीतून जमा झालेल्या पैशातून बांधली गेली आहे. दक्षिण अमेरिकेत जुगाराविषयी अतोनात प्रेम आहे व अगदी त्याचाच फायदा उठवून ही युनिव्हर्सिटी बांधली आहे.

हे बघून मी नेहरूना पत्र लिहिल व आपणही लॉटरी चालू करावी असे सुचवलं. त्यानी मला तावडतोब लिहिल की जुगार वगैरे गोष्टी आपल्या भारतीय रक्तात नाहीत नी आता त्या भिनवायची माझी इच्छा नाही.

पण इतक्या वर्षांनी आपल्या देशातसुद्धा लॉटरी सुरू झाली आहे हे पाहून मला बर वाटत. दुसऱ्या देशाच्या अनुभवापासून धडे घ्यायला भारताला सहसा फार काळ लागतो. दारूबंदीच्या अमेरिकेच्या धडचापासून आम्ही काही शिकलो नाही, त्यामुळे भ्रष्टाचार माजला, लाचलुचपत माजली व जेव्हा गळघापर्यंत आलं तेव्हाच आम्ही धडा शिकलो व दारूबदी रद्द केली.

क्यूबा त्या मानाने सपूर्णपणे वेगळंच होतं अगदी मूठभर माणसं हाताशी घेऊन कॅस्ट्रोने क्रातीला सुरुवात केली होती व ती यशस्वी केली होती. सुरुवातीला क्यूबाचे व अमेरिकेचे चागले मित्रत्वाचे सबध होते, पण नतर नतर मात्र ती घसट कमी झाली व 'बे ऑफ पिग्ज' प्रकरणाने तर दोन्ही देशातले सबध पारच रसातळाला गेले. बे ऑफ पिग्ज प्रकरणात सी. आय. ए ने केनेडीना सपूर्णतया चुकीचं मार्गदर्शन केल. कॅस्ट्रोविरूद्ध क्यूबात वड वगैरे काहीच उद्भवले नव्हते. पण सी. आय. ए. ने केनेडीसमोर सपूर्ण वेगळीच परिस्थिती चित्रीत केली. असलेल्या घटना सी. आय. ए. ने केनेडीसमोर माडल्या नाहीत तर घटना कशा असाव्यात हे केनेडीसमोर सी. आय. ए. ने माडल. त्याने केनेडीची सपूर्ण फसगत झाली व अमेरिकेची जगात नाचक्की झाली. सी. आय. ए च्या बातम्या आणण्याच्या व हेरगिरी करण्याच्या कौशल्यावर या प्रकरणामुळे चागलाच प्रकाश पडला.

मी क्यूबाला जेव्हा प्रथमच गेलो तेव्हा तेथल्या चीफ ऑफ प्रोटोकलने माझे स्वागत केले. तो अत्यत पोरसवदा दिसत होता. मी त्याला त्याच्या तारुण्याबद्दल विचारल तर तो म्हणाला, 'आमची सारी क्रातीच तरुण रक्ताची आहे.' त्यानतर मी परराष्ट्रमत्र्यांना भेटायला गेलो. प्रथम एक अत्यत तरुण मनुष्य बाहेर मला भेटायला आला. मला वाटल की तो मत्र्याचा खाजगी चिटणीस वगैरे असेल. पण नाही तो तरुणच क्यूबाचा परराष्ट्रमंत्री होता.

कॅस्ट्रो स्वत च विलोभनीय होते. त्यानी सागितल की, 'त्याची क्राती रशियन नव्हती की चीनी. त्याची क्राती क्यूबन परिस्थितीला उचित अशी क्यूबन क्राती होती.'

क्यूबामध्ये परदेशी पाहुण्याच आदरातिथ्य नेहमी कुठल्यातरी सार्वजनिक हॉटेलात करण्यात येत. त्याप्रमाणे प्रख्यात लेखक अर्नेस्ट हेमिंग्वे नेहमी जात असलेल्या एका हॉटेलामध्ये मला खाना देण्यात येणार होता. सार मत्रीमडळ त्याला उपस्थित राहाणार होत. कॅबिनेटमध्ये पुढे जगप्रसिद्ध ठरलेले चे गव्हेराही होते. पेयपानाकरिता आम्ही रात्री ९ वाजता हॉटेलात भेटलो. वक्तशीरपणा हा दक्षिण अमेरिकन लोकाचा काही खास गुण नाही. त्यामुळे साधारण ९॥ पर्यंत सारे मत्री लोक हॉटेलात जमले. पण कॅस्ट्रो काही आले नव्हते. चे गव्हेरा मला म्हणाले की, 'कॅस्ट्रो इथे येणार हे नक्की. कारण ते मला तस बोलले आहेत. त्यामुळे आपण जेवणाला आरभ करूया ते आल्यानतर तेही आपल्यात सामील होतील.' आम्ही आरभ केला. साधारण १२॥ च्या सुमाराला कॅस्ट्रो आले. तोपर्यंत आमच जेवण सपलसुद्धा होत कॅस्ट्रोकरिता मी एक खुर्ची रिकामीच ठेवली होती. आल्यावर त्यानी प्रथम ब्रँडी मागितली. मी म्हणालो, 'काय आधी थोडफार खाणार का?' त्यावर हसत ते म्हणाले, 'वा! ब्रँडी हे सुद्धा दुसऱ्या कुठल्याही खाद्याएवढेच पूरक आहे'

बाजूच्या खोलीत दोन व्हायोलिनवादक व्हायोलिन वाजवीत बसले होते त्याना कॅस्ट्रो आले आहेत हे समजताच ते आमच्या इथे आले व स्नेहभराने कॅस्ट्रोना त्यानी अलिंगन दिले. कॅस्ट्रोही एक पतप्रधान म्हणून नव्हे तर एखाद्या सामान्य नागरिकासारखे त्याच्याशी अत्यत मोकळेपणाने गप्पा मारीत होते. त्याच जेवण होईपर्यंत साधारण १ वाजला. त्यानतर आम्ही दोघेही बाहेर आलो. कॅस्ट्रो जाईपर्यंत साहाजिकच मला थाबण भाग होत. ते रस्त्यावरच्या जमावाशी गप्पा मारीत होते मला कोणीतरी सागितल की मी त्याची जाण्याची वाट बघत थाबलो तर पहाटे ४ पर्यंत मला थाबाव लागेल. मी त्याच्याशी हस्तादोलन केल आणि कॅस्ट्रोचा निरोप घेऊन हळूच सटकलो. मला दुसऱ्या दिवशी कळल की आदल्या दिवशी मला जे काही सागण्यात आल होत ते ततोतत खर होत. अक्षरश: पहाटे चारपर्यंत कॅस्ट्रो जमलेल्या लोकाशी गप्पा मारीत उभे राहिले होते म्हणे.

चे गव्हेरांशी बोलताना ज्याने आपले तनमनधन क्रातीकार्यार्थ वाहिले आहे अशा स्वप्नाळू द्रष्टयाशी बोलल्यासारखे वाटले. राजकारणी वा मत्री यापेक्षा ते द्रष्टेच दिसत होते. त्यावेळी क्यूबाची सारी अर्थव्यवस्थाच जणू साखरेच्या निर्यातीवर उभी होती व ती पण अमेरिकेला निर्यात, त्यामुळे अमेरिकेने त्या निर्यातीवर बदी घातल्यावर क्यूबाच्या अर्थव्यवस्थेला चागलाच धक्का पोहोचला. त्यामुळे क्यूबाची अर्थव्यवस्था सावरण्याचे काम कॅस्ट्रोना करावे लागणार होते. त्यात अडचणी अनेक होत्या पण अत्यत जिद्दीने व तडफेने कॅस्ट्रो ते काम करीत होते यात शकाच नाही.

[ क्रमशः ]

---


## साप्ताहिक माणूस : वर्गणीचे नवे दर

वार्षिक : छत्तीस रुपये

सहामाही : वीस रुपये

परदेश : (जलमार्गे)

पंचावन्न रुपये



# घरा घरांवर रत्न तोरणे!

अरुण
श्रीधर
इनामदार

मला वाटते, मी सुटका शोधीत होतो – माझ्या स्वतःपासूनच. आपल्याला काय करायचे आहे? नसती पंचाईत करा कशाला? चालते आहे, तर चालू द्यावे– रांगते आहे, रांगू द्यावे – कडेवर उचलून घ्या कशाला? आपल्याला काही मिळणार आहे काय? जगाच्या कितीही घशात हात कोंबा, तो कोरडाच निघावयाचा – आपण गप्प बसावे, गोड असावे. न बोलेल, तो शहाणा–

मनोमन मी अलीकडे शहाणा होत चाललो आहे. तेव्हाही तसेच घडले. दिवसभर माझ्याच या 'शहाणपणा'च्या शिस्तीत गप्प राहिलो, खोटे–खोटे 'छान! थँक्स्! ओ हो! काँग्रेट्स्!' म्हणत राहिलो, ऐकत राहिलो. परंतु माझा मीच, माझ्या या 'सूज्ञते'च्या पेपरवेटखालून फडफडत होतो, अखेर त्यातून सुटलो. पोटात भीती दडपलेली होती; आता ती उसळून वर आली. एका प्रचंड काळ्या पक्षाने पंख पसरून मला घेरून टाकले, आणि मी ओरडलो, 'मार्शलजी! सांभाळून हा!'

हसणारे मला हसलेही असतील! नवरदेवालाच मी गमतीने 'एअरमार्शल' म्हणत होतो. तो हुद्दा त्याला मनोमन शुभेच्छांसारखा बहालच करून टाकला होता. एअर फोर्समधला पोरगा. मोटरगाडीचे ड्रायव्हिंग करू निघाला होता, आणि मी त्याला 'सांभाळून!' म्हणून सांगत होतो!

दिवसभर माझी 'बूर्झ्वा', अडाणी भीती आता वर आली होती, आणि चमत्कारिक आवाजाने मी ती अति उंच समाजाच्या त्या वर्गात पोचविली होती! हसणारे हसले असले, तर त्यांच्याकडे काय चूक?

परंतु माझा हलकासा आवाज कारच्या ड्रायव्हिंग्-सीटमधील नवरदेवांपर्यंत पोचला. कसा–देव जाणे! आणि त्याच्या दिशेने आश्वासक जबाब आला, 'हा इनामदार – बिलकुल! डोन्ट वरी!'

मला ती पावती होती. जड झालेल्या पावलांना उत्साह देणारी. मी कार्यालयाकडे वळालो. प्रवेशद्वाराशी नक्षीच्या कमानीचे दोन लाकडी स्तंभ आहेत. दिव्यांच्या माळांनी शृंगारलेले. माझ्या ओठी गाणे आले– 'घरा-घरांवर रत्न-तोरणे, अवती-भवती रम्य उपवने–'

होय, या कार्याचे तोरण मीच आज सकाळी बांधले होते, किंचित घाबरतच. अनेक परंपरागत गोष्टींना या कार्यात फाटा देण्यात आला होता. तोरण बांधणे ही गोष्टही 'मागासले'पणाची ठरली म्हणजे? आमचे छानपैकी हसू व्हायचे!

–याक्षणी एक उदास, कृतार्थता वाटते

आहे. जड, आळसल्या पावलांनी मी कार्यालय जवळ करतो आहे दिव्याच्या त्या माळा जवळ जवळ येत आहेत, आणि एका गुंगीत असल्यासारख्या माझ्या डोळ्यासमोर माझ्या जिवलग मित्राच्या या विवाहाची चित्रे 'श्रीगणेशा'पासून तरळत आहेत–

श्रीगणेशा!

पत्रे लिहायला सुरुवात तर करून बसलो होतो. मी वर पाहिले. मित्राच्या मातोश्री झपाटयाने पुढे पुढे चालल्या होत्या–'अमक्याला आशीर्वाद लिहा हं. याला विसरू नका. आणि त्याला? अय्या–हा विसरलेच–तिला नमस्कार हवाच! त्याना काय लिहावे बरे? पपीला लिहा, म्हणावे, ये बरे का नक्की?–

मी बोलायचे टाळले. श्रीकार लिहिला गेलाच नाही! मित्राचे कार्य मी हौसेने कामे अगावर घेतली होती, आणि खोल पाण्यात शिरत चालल्यासारखा आता थबकू लागलो होतो. या 'अल्ट्रा मॉडर्न' विवाहातील असख्य प्रवाह माझ्या दिशेच्या उलट धावणारे होते. थोरला भाऊ सर्जन. 'हॉस्पिटलवर तोरण कशाला बाधावयाचे? नको, नाही का?' त्याच्या, डॉक्टरच असलेल्या सौ. नी मिसेसूनी – आपले मत देऊन टाकले होते, आणि मी चूप झालो होतो–

तिसऱ्या दिवशी प्रश्न माझ्या अगदी ओठावर होता, 'काय, देवाना अक्षत केव्हा निघायची?'

आणि मला कळले, पत्रिकाचे काही गट्ठे केव्हाच वाटणाऱ्याबरोबर रवाना झाले आहेत–अमक्या कॉलनीत बबनच्या हाती, तर तमक्या सोसायटीत तमक्याबरोबर! पिंपरीला तो 'हा' देणार होता, तर खडकीला–

प्रश्न मी गिळून टाकला. मीच धावयास हव्या होत्या, अशा पत्रिका घेऊन बाहेर पडलो. पत्ते शोधून काढणे हे काय सुख असते, ते शोधणारालाच ठाउकी! मनसोक्त शोधाशोध केली. दोन-तीन दिवसानंतर 'तवकात राहिले देठ, लवगा, साली–' इतपत किरकोळ पत्रिका उरल्या, तेव्हा माझ्या ध्यानी आले–नवरदेवांच्या अगदी निकटच्या नातेवाईकाच्या पत्रिकाही पोस्टाने रवाना झाल्या होत्या! त्यासाठी विशेष आटापिटा करण्याची आवश्यकताच होती कोठे? मीच उगीच भरीला पडलो, असे झाले होते!

–परंतु मला आता त्याची पर्वा नव्हती. माझ्याच अगात लग्नाचा जणू सचार झाला होता! 'एअर मार्शल', आणि त्याची आई वगैरे कंपनी मात्र होती जाणती. माझ्या धावपळीचे गाणे त्याच्यापर्यंत पोहोचत होते, ही एक उल्हासाची गोष्ट होती! अधूनमधून मी विचारही करीत होतो. त्याना कौतुकच नव्हते, अशातला बिलकुल भाग नव्हता! खरे तर माझ्यापेक्षा माझी नवलाई त्यानाच अधिक होती. मार्शलजीच्या लग्नाच्या काळात, माझ्या नक्षीकामाचे एकही अर्जंट गिऱ्हाईक मी एन्टरटेन् केले नव्हते, ही गोष्ट 'माँ'जीनी शब्दश सातासमुद्रापार पोचविली होती. त्याचाच एक भाचा लडनला जाण्यापूर्वी एका कोरीव बॉक्सच्या कामासाठी माझ्याकडे आला होता, तेव्हा मी त्याला सपशेल हात जोडले होते–'हात मला दोनच आहेत!' मी म्हणालो, 'आणि त्याना या लग्नाचे डोक्यावरून दोन पुरुष पाणी जाईल, इतके काम आहे! तेव्हा–सध्यातरी बोलूच नका!'

–ही गोष्ट 'माँ'जीनी फक्त वर्तमानपत्राना कळविण्याची बाकी ठेवली होती. अनोळखी मडळीनी तर माझा नबर 'माँ'जीचे दुसरे चिरजीव'–इथपर्यंत वर चढविला होता–आणखी काय कौतुक व्हायला हवे?

परंतु ही सारी होती कागदाची फुले! निदान मला तरी त्याना सुवास असल्याचे दिसत नव्हते. जाणवत नव्हते. बाहुला-बाहुलीचा विवाह थाटाने लावणाऱ्या मुलाचे आपण कौतुक करतो, तसे काहीतरी माझ्या बाबतीत चालले आहे, असे वाटत होते! घरावर साधे तोरण लावण्याचे कोणाला सुचू नये, याचे मी आश्चर्य करीत होतो. कुरडया-पापडया वगैरे गोष्टीचे तर बोलावयाचेच नाही; 'लग्नघर' कसे नादते-गाजते, गरजते-वाजते दिसावे! पोरानी हैदोस मांडलेला असावा! गुरुजी–पुरोहिताची उपरणे सावरीत धावपळ दिसावी! घर एका नाविन्याने अखड जागे दिसावे, चुलीला, स्टोव्हला, गॅसला, रेजला, क्षणभर फुरसत नसावी, माणसाचा कामाने पिट्टया पडावा–रात्री (बाराच्या पुढे) बसल्या जागीच डोळे मिटावे–जाग यावी ती सनईवाल्याच्या हाकानी,–

–असे काही इथे दिसत नव्हते! सारे कसे आखीव, रेखीव, नीटनीटके. एक गमत सागतोच–दूध उतू गेलेले मला इथे अजून दिसले नव्हते–वासही नव्हता! हे कसले लग्नघर?

आणि याला कारण एकच होते–आधुनिकपणा! या सगळया लोकानी 'मॉडर्न'-पणाच्या हव्यासासाठी आयुष्यातला आनंदच घालवून टाकला होता, असे मला चक्क दिसत होते. गणिताच्या पुस्तकात सोडवून दाखविलेले गणित असावे ना, तसे सगळे व्यवस्थेशीर, स्टेप्–बाय–स्टेप्–घडत होते! कर्त्या पुरुषाचे पाकीट हरवत नव्हते की बाईंनी 'आत्ता–इथे' काढून ठेवलेली सव्वा तोळयाची अगठी डोळयाआड होऊन सर्वांचा घाम निघत नव्हता! कॉंट्रॅक्टर, फुलवाले, माडववाले–एरवी घुकारपणा करून प्राण कठाशी आणणारी, नवऱ्या मुलाच्या वरताण मिजास करणारी माणसे–इथे नाटकातल्यासारखी वेळच्या वेळी येऊन हजर होत होती, भाव, पैसे, कोठेही घासाघीस न करता सारे काही ठरवून 'बराय!' म्हणून (चपला न आपटता) चालू लागत होती–'आमचे स्थळ थोडक्यात पदरात पडले हो याच्या'–अशी वरमाईंची आदळआपट नाही न् काही नाही! सारे कसे अप्-टु-डेट्!

अखेर मी अगदी 'नर्व्हस्' बनलो, तो मगलाष्टकाच्या निमित्ताने. ती माझीच ड्यूटी होती आणि मीच ती लिहिणार होतो. मीच लिहावयास हवी होती–

परतु मी एकदम थड बनलो–लग्न नोंदणी पद्धतीने व्हावयाचे होते! 'कशाला तो गलका, गडबड नि धावपळ उगाच?' वरमाई नरमाईने म्हणाल्या.

छान! मीही मग स्वस्थ झालो. कशाला धावपळ, गडबड उगाच? आणखीही एका गोष्टीत हा माझा निर्णय कौल देऊन जाणार होता–प्रेझेंट!

'मार्शलजी'ना प्रेझेंट काय द्यावे, या प्रश्नात सुरुवातीपासूनच पडलो होतो! पत्रिकेवर मारे 'प्रेझेंटस आणू नयेत' असे ऐटीत छापले होते, परंतु मला प्रेझेंट द्यायलाच हवे होते. जनाचीही लाज धरायला हवी होती आणि मनाची–त्याहून अधिक! आणि खरोखर, माझ्या मनालाही प्रेझेंट द्यावेसे वाटतच होते. 'मार्शल' माझा फार

जिवाभावाचा मित्र–नव्हे, स्नेही–कसला, सोबती. खरेच, सोबती! त्याच्या तोडात माझ्या प्रेझेंटचा पेढा कोबल्यावाचून मला गप्प बसवणार नव्हते.

मी विचार करू लागलो याला द्यावे तरी काय? अखेर माझ्या ध्यानात येऊन चुकले, बाजारात मला हवी ती वस्तू नव्हती. या पृथ्वीच्या पाठीवर नव्हती. असणारच नव्हती. होती फक्त माझ्या कल्पनेत– आणि तिला आकार द्यावयाचा होता मी! मीच! होय, मला हातानीच काही तरी प्रेझेंटेबल बनवायला हवे होते–

येस्! चुकला फकीर मशिदीच्या मार्गाला नेमका निघाला होता! माझेच हे काम! मी शीळ वाजविली. काही तरी भेट देण्यासारखे मलाच तयार करायला हवे!

उत्साहाने झपाटल्यासारखा मी वस्तू–करू लागलो, आणि या 'मॉडर्न' झगझगाटापुढे पार दिपून गेलो, मला अगदी क्षुद्रासारखे वाटू लागले, सगळा उत्साह सपून गेला, मी अगदी होत्याचा नव्हता झालो. माझा मलाच हास्यास्पद वाटायला लागलो! छे, ही अगदीच अडाणी, ओबडधोबडपणाची कल्पना होती!

एवढ्या मोठ्या ठिकाणी माझी वस्तू बरी दिसेल का? हसतील सगळी धेंडे मला!

आणि दुसरे म्हणजे, माझे मलाही 'मार्शल'बद्दल तसे काही वाटेनासेच झाले होते·

–करायचेय् काय धडपडून? त्याला थोडेच कौतुक? माझ्या वस्तूकडे तो पहाणारही नाही. तोंड भरून 'थँक्स्' म्हणेल, पुढच्याच क्षणी पुढच्या 'गेस्ट'ना ओ हो हो हो! या! थँक्स्!' म्हणायला वळेल.

मी का म्हणून मेहनत करावी?

शेवटी हेच ठरले. तिरमिरीसरशी उठलो, एक बऱ्यापैकी पेन्-बॉल्-पेन्चा प्रेझेंटेशन-सेट् गोळा केला, वर लाल कागद गुडाळून टाकला.

झाले प्रेझेंटचे काम! मनाशी म्हटलेही, सागितले आहे कोणी जादा कौतुक? तू मॉडर्न असशील, तर ही कागदाची फुलेच तुला बरी!

कार्यालयाच्या दाराकडे रात्रीच्या वेळी चालताना माझ्या खिशात तो सेट् आहे. परत जाताना देईन मो तो 'मार्शल'जीना. आत्ताच तो गाडी घेऊन घराकडे गेला आहे. लक्ष्मीपूजन, उबरठ्यावरी माप ठेविले– वगैरे गोष्टी अर्थातच असणार नव्हत्या. कार्यालयाचा 'चार्ज' देण्याची-घेण्याची, गडबड चालली होती. पुढच्या भागात प्रकाश, कार्यालयाची मागील बाजू काळोखात बुडाली होती. एकादा आवाज हॉलमध्ये घुमत होता. एखादी मोठी शाळा सुट्टीच्या दिवसात शात-शांत दिसावी, तसे उगीचच गप्पगप्प वाटत होते.

मी जडपणाने दिव्याच्या माळांनी नटलेल्या महिरपीच्या दारापर्यंत पोहोचलो, आणि थबकलो. आतील दार उघडले गेले, आणि भव्य पॅसेजमधून काही माणसे पुढे आली.

ती वधूची मडळी होती. बहुतेक तिचे वडील. आई मला वाटते नसावी. भाऊ होते. आडवे उभे, बबू. एक आमच्या–वरमाई. बुट्टया-बुट्टयाच्या लुगड्यातल्या. चष्मा लावलेल्या. कपाळावर व्यवहारीपणाची एक अस्पष्ट आठी आहेच. आणि भिजलेल्या मांजरासारखी, वधू.

मी दूरच घुटमळलो. त्याचे नमस्कार-चमत्कार झाले, 'गुड बाय!' 'बराय!' 'या!' संपले, व ते पुढे आले. आता मी त्याना दिसलो. आणि एक विलक्षण गोष्ट घडली.

त्यानी बॅग्ज खाली ठेवल्या व माझ्याकडे येऊन हात जोडले. 'बराय सरकार! येतो–सांभाळा!'

काय सागावे महाराज, माणसे उभीच्या उभी रडायला लागली. वाहवा, जणू मीही त्याचा–वधूचाच कोणी नातलग होतो–अगदी भावाच्या रँकचा!

वरमाईंना सागणे जमले नव्हते, ते आता उफाळून आले होते.. लेकीला सोडून ती माणसे बिस्तरे घेऊन परत निघाली होती. आणि मी, शेवटचा विश्वासाचा जिवलग त्याना भेटलो होतो! घरच्यापेक्षा घरचा–जिवाभावाचा.

दिव्यांच्या माळामधून ती विचारी बाहेर पडली. पोरक्या मुलासारखी. भटक्या लमाणासारखी! त्याच्या सावल्या लाब लांब, घुटमळत, एकमेकींत घुसमटत होत्या.

कोठून तरी व्हायोलीनवाले माझ्या मनात दाही दिशानी धावत आले, आणि मनाचे कवाड रत्नतोरणानी नटून उठले. लख्ख प्रकाश पडला. ही 'मॉडर्न' माणसे, रडू शकत होती! होय, ओक्साबोक्शी!

हा पेन सेट आता कसा द्यावा? मला हातानीच काही बनवायला हवे! माझ्या चष्म्यावर त्या दिव्याच्या ठिपक्यांनी आरास मांडली, आणि माझा अगावरचा, किंचित सैलावलेला झब्बा, मला कृतार्थ वाटू लागला. ☐ ☐

## राष्ट्रीय पदवीधर योजना ( National Graduate Scheme )

पदवीधराना ग्रामीण विकास कार्याची सधी उपलब्ध करून देणारी ही योजना मुबई विद्यापीठाच्या प्रशासनाखाली गेले सुमारे दहा महिने चालू आहे. केंद्रीय सरकारच्या शिक्षण मत्रालयाचा या योजनेला आर्थिक पाठिंबा आहे. मुळात ही योजना विद्यार्थ्यांनीच कल्पिलेली व अमलात आणलेली आहे.

कोकनेर-गर्वशेती (ता. पालघर, जि. ठाणे) हा आदिवासी भाग, वाघोली (ता. हवेली, जि. पुणे) व सुजलेगाव (जि. नांदेड) इत्यादी ठिकाणी मिळून १५ स्वयसेवक बँकांच्या सहकार्याने शेती उत्पादनाची व इतर विकासाची कामे करीत आहेत.

नवीन स्वयसेवक आता घ्यावयाचे आहेत. दरमहा दोनशे रु. इतके निर्वाहवेतन स्वयसेवकांना मिळते. घरभाडे, प्रवास, औषधोपचार इत्यादीचा खर्च योजनेमार्फत केला जातो. ज्याना ग्रामीण व विशेषत. आदिवासी भागात शेतकऱ्यामध्ये राहता येईल, दलित व दरिद्री याच्यासाठी निरलसपणे काम करण्याची ज्याना इच्छा आहे, आपल्या विषयात ज्यांची गती बऱ्यापैकी आहे अशा काही थोड्याच पदवीधर तरुणाना निवडावयाचे आहे. (ही योजना बेकारी निवारण योजना नसून सेवा-योजना आहे हे प्रामुख्याने लक्षात ठेवले पाहिजे) निवडलेल्या स्वयसेवकाना ऑगस्ट किंवा सप्टेंबर १९७४ पासून एक वर्षभर काम करावे लागेल.

इच्छुकानी पूर्ण वैयक्तिक तपशील, जन्मतारीख, शिक्षण, परीक्षेतील गुण, शिक्षणसस्था, कौटुंबिक माहिती, समाजकार्याचा अनुभव छद, इत्यादीसह, 'प्राध्यापक-सल्लागार, नॅशनल ग्रॅज्युएट स्कीम, अर्थशास्त्र विभाग, मुबई विद्यापीठ, विद्यानगरी, कालीना मुबई ४०००५७' या पत्त्यावर...ताबडतोब लिहावे.

कलोपासक आयोजित

# एकांकिका महोत्सव

वि. भा. देशपांडे

महाराष्ट्रीय कलोपासक संस्थेने जून महिन्याच्या ८ आणि ९ तारखेला एक एकांकिका महोत्सव साजरा केला पुण्या-मुंबईमधल्या काही महत्त्वाच्या संस्था त्यामध्ये सहभागी झाल्या. महोत्सवातील संस्था आणि एकांकिका पुढीलप्रमाणे– १) उन्मेष युवक प्रायोगिक नाट्यसंघ, मुंबई– 'गोल भोकात चौकोनी खिळा' २) टेल्को कलासागर, पुणे– 'तुमचे आमचे गाणे' ३) पी. डी. ए. पुणे– 'बंधमुक्त' ४) मित्र सहयोग, ठाणे– 'दर्द न जाने कौन' ५) ड्रापर्स नाट्यसंस्था, पुणे– 'क्रॅप्स लास्ट टेप' ६) उदय कला केंद्र, मुंबई– 'राजा आणि राणी' ७) चित्तरंजन नाट्यसमाज, मुंबई 'थाप्प्यो' ८) अनिकेत, मुंबई– 'काळ काम वेग' ९) थिएटर अ‍ॅकॅडमी, पुणे– 'भिरभिरे'.

विस्तार भयास्तव प्रत्येक एकांकिकेचे सविस्तर परीक्षण करणे अशक्य आहे. त्यामुळे त्या त्या एकांकिकेच्या प्रयोगाचे मनावर उमटलेले ठसे शब्दरूप करीत आहे. प्रयोगाचा सांघिक परिणाम म्हणून ज्या एकांकिका स्मरणीय झाल्या त्यामध्ये 'गोल भोकात चौकोनी खिळा,' 'तुमचे आमचे गाणे,' 'थाप्प्यो' 'काळ काम वेग' इ. मध्ये दिलीप कोल्हटकर, विकास पंडित, विहंग नायक आणि अनुया पालेकर या चारीही दिग्दर्शकांनी एकांकिकेतील मूळ गाभा जाणून घेतला आहे असे जाणवत होते. विशेषत. एकांकिकेतील विविध प्रकारच्या विरचना त्यांच्या दिग्दर्शनातील जाणतेपणाची साक्ष देत होत्या. या चारीतही विहंग नायकाची 'थाप्प्यो' ही अनेकार्थी लक्षवेधी होती.

पी. डी. ए. ची 'बंधमुक्त' आणि मित्र सहयोगची 'दर्द न जाने कौन' या दोन्हीही एकांकिका शालेय सम्मेलन किंवा तत्सम पातळीवरील समारंभात सादर व्हाव्यात तशा झाल्या. एकांकिकेच्या निवडीपासून प्रयोग दर्शनापर्यंत सारेच काही भडक, ढोबळ आणि परिणामशून्य असे होते. मराठी एकांकिकेत अनेक आव्हानात्मक स्वरूपाचे प्रकार आता नव्याने निर्माण होत आहेत याची या संस्थानी दखलही घेतली नसावीसे दिसते.

'क्रॅप्स लास्ट टेप' ही बबन प्रभु अनुवादीत एकपात्री एकांकिका ड्रॉपर्सने सादर केली. पण या एकांकिकेची प्रयोग वेळ फारच अवेळ होती रात्री दीडच्या पुढे एकांकिका सुरू झाली. अगोदरच्या एकांकिकामुळे सारेच वातावरण कंटाळवाणे झाले होते. त्यात ड्रॉपर्सची ही एकांकिका मोठ्या प्रेक्षागृहासाठी करण्याच्या प्रकृतीची नव्हती. ती छोटयाशा हॉलमध्ये (इन्टिमेट पद्धतीने) करण्याची होती. वेळ आणि स्थळ दोन्ही दृष्टीने एकांकिकेचा होरा चुकला. परिणामी ती अधिकच कंटाळवाणी झाली. थिएटर अ‍ॅकॅडमीने सरिता पदकी यांचे 'भिरभिरे' सादर केले. पाश्चात्य रंगभूमीवरील 'रिव्हयू' पद्धतीने 'भिरभिरे'चे लेखन होते. तीन प्रसंगापैकी पहिले दोन प्रसंग लेखन आणि प्रयोग दृष्टया क्षीण होते. तिसरा सर्वाधिक परिणामकारक होता. उदय लागू यांचा दिग्दर्शनाचा प्रयत्न चांगला वाटला.

अशा प्रकारचा एकांकिका महोत्सव पुण्याच्या नाट्यविषयक चळवळीत वेगळे रूप धारण करणारा आहे. कारण पुण्या-मुंबईतील काही संस्थाना इतक्या मोठ्या प्रमाणात प्रथमच एकत्र आणण्यात आले. कोणत्याही प्रकारे स्पर्धात्मक भावना न ठेवता केवळ प्रयोगदर्शन एवढाच संयोजकांचा हेतू होता. कलोपासकांनी परिश्रमपूर्वक हा महोत्सव घडवूनही उत्तम प्रयोगाचे प्रमाण अत्यल्पच होत. निम्म्या अधिक संस्था फारसे परिश्रम न घेता तयार असलेल्या एकांकिका घासून पुसून सादर करीत आहेत असे जाणवले. महोत्सवाचे गांभीर्य त्यांनी जाणले असते तर अनेक प्रयोग स्मरणीय झाले असते! एक दोन उणिवेच्या गोष्टी जाणवल्या त्या म्हणजे प्रेक्षकांची अल्प उपस्थिती दुसरी गोष्ट म्हणजे यजमान संस्थेने या महोत्सवात एकही एकांकिका सादर केली नाही. असे का झाले कोण जाणे! पण व्हायला नको होते. ह्या उणिवा मान्य करूनही कलोपासकाचे कार्यकर्ते विशेषत: राजा नातू यानी या महोत्सवाचा योग घडवून आणला, त्याबद्दल त्यांना धन्यवाद! ◻

कलोपासक जून

# लगी शर्त

कलोपासकाच्या 'प्रयोग' उपक्रमातील जूनमधील एकांकिका होती माधव आचवल लिखित 'लगी शर्त!' एका चित्रकाराच्या आणि त्याच्या प्रेयसीच्या जीवनावर आधारलेली ही एकांकिका आहे. त्या दोघांच्या विवाहपूर्व प्रेम जीवनातील रागलोभाचे हलके फुलके दर्शन लेखकाने छोट्या छोट्या प्रसंगातून व्यक्त केले आहे. एकांकिकेचा पूर्वार्ध हलक्या-फुलक्या प्रसंगानी रंगवलेला असून त्याचा विस्तार काहीसा जाणवतो. उत्तरार्धात वैवाहिक जीवनाचे स्वप्न आणि त्यातील मानवी स्वभावाचे चित्रण वेधक आहे

शरद वर्तक आणि शोभा पत्की हे प्रमुख कलाकार होते. दिग्दर्शक होते धनंजय गोळे. दोन्ही कलाकारांचा रंगमंचावरील वावर सहज तेचा होता. भूमिकेच्या दृष्टीने दोघांचीही निवड सुयोग्य होती. वर्तकाचे डोळे एरवी चष्म्याचे आहेत हे सतत जाणवत होते त्यांची डोळयांची अतिरिक्त हालचाल त्रासदायक वाटत होती लेंगा–नेहरू शर्ट असा काहीसा सुटसुटीत पोशाख त्यांना दिला असता तर त्यांच्या वावरण्याला आणि भूमिकेला अधिक सहजपण आले असते.

एकांकिकेचा सर्वसामान्य संकलित परिणाम प्रेक्षकाना सुखावह वाटत असला तरी काही गोष्टी अभावाने जाणवत होत्या. संवादातील विराम (थांबे) या गोष्टीकडे दिग्दर्शकाने अधिक काळजीपूर्वक पाहणे अगत्याचे होते. विशेषत प्रसंगपरत्वे भावनाचे स्वरूप जसे बदलत होते त्या ठिकाणी संवादातील विरामांचा वापर महत्त्वाचा असतो. काही ठिकाणी विरामाचा अभाव असल्याने संवाद फक्त म्हटले गेले एवढेच! दोन-तीन विरचना दिग्दर्शकाने कल्पकतेने केलेल्या आहेत असे जाणवले. पण त्याचबरोबर आणखी एक गोष्ट अभावाने जाणवली ती म्हणजे दोन प्रियकरामधील प्रेमाचे हळुवार चित्रण काही वेळा शब्दानी नेत्रकटाक्षानी, स्पर्शांनी व्यक्तवले जाते तसेच ते शारीरिक जवळीकतेने अधिक प्रत्ययकारी होते. या एकांकिकेत ही जवळीक जाणवली नाही. त्यामुळे भावपूर्ण–प्रेमयुक्त शब्द आणि दूर अंतरावरून केलेला आंगिक अभिनय यातील अंतर परिणाम पुसण्यास मदत करीत होते. ◻

## बंगाली रंगभूमी

सौ. तारा पंडित

## नितीश सेन यांचेबरोबर एक सकाळ

नितीश सेन...नाव ऐकल्याऐकल्यासारखं वाटत होत. पण नक्की कोणत्या संदर्भात ते आठवेना. बगालच्या सुविख्यात रगमच अभिनेत्री श्रीमती तृप्ती मित्र ह्याच्या आदर्शाप्रमाणे नितीशबाबूना फोन केला. काही मिनिटाच्या बोलण्यावरूनच गृहस्थ अगत्यशील वाटले. उद्या सकाळीच माझ्याकडे या म्हणाले.

सकाळी वेळेच्या आधी दहा मिनिटं त्यांच्या दारात पाय ठेवला. त्यानी हसतमुखाने स्वागत केल. स्थानापन्न झाल्यावर म्हणाले, बोलूया ?

मूळ मुद्याला हात घालण्यापूर्वी आम्ही अवातर गप्पा सुरू केल्या नि त्यातच रगलो. बोलता बोलता ते म्हणाले— मला मराठी माणसाबद्दल फार आदर वाटतो. विशेषत: नाटककाराच्या बुद्धिमत्तेच भारी कौतुक वाटत. तेडुलकर, पी. एल्. देशपाडे.. काय माणस आहेत ! बेफाम लिहितात की ! खरच, बाइडरसारख्या सामान्य प्रतीच्या माणसाला नाटकाचा हीरो बनवणं... its not an easy joke ! तुमची मराठी रगभूमी फारच पुढे आहे बुवा ! बगाली नाटककार अशा तऱ्हेच नाटक लिहू शकणार नाही. उद्या मी जर नाटक लिहून एका विधवेला नाटकाची नायिका बनवली तर ते नाटक आमचे लोक हाणून पाडतील.

'खरच ? पण ह्याच कारण काय ?'

'कारण एकच. आम्ही आमच्या परपरेला अगदी चिकटून बसलो आहोत. ती आम्ही सोडू शकत नाही. एखाद्याने सोडू म्हटलं तर समाज त्याला तसं करू देणार नाही. म्हणून म्हणतो तुमची मराठी रगभूमी त्यादृष्टीने फार पुढे आहे. तुमची नाटके सखाराम बाइडर, घाशीराम कोतवाल, गिधाडे इत्यादीवरून तरी तसच वाटतं. इथे माझ्या ओळखीचे एक महाराष्ट्रीय गृहस्थ आहेत, एस्. बी जोशी....माहीत आहेत तुम्हाला ?'

मी म्हटल, 'अर्थातच. त्यांचा आमचा चागला परिचय आहे. अत्यत विद्वान गृहस्थ. चालता बोलता एनसायक्लोपीडीयाच आहे म्हणाना.

त्यांनी जोशीचं नाव काढताच माझ्या डोक्यात घंटी वाजली. मी पुढे म्हटलं, 'शातता कोर्ट चालू आहे ह्या नाटकाचा बगाली अनुवाद तुम्ही अन् जोशीनी मिळूनच केलाय् ना ?

नितीबाबू म्हणाले, 'होय. भारी मजा आली हृ त्यावेळी. जोशी मला बगालीत समजावून द्यायचे. मग कुठेतरी एखादा साहित्यिक शब्द सागा म्हणायचे, छे छे ! ह्याच्यापेक्षा चागला शब्द सागा, आणखी चागला शब्द सागा. मला हसू यायच. त्याच समाधान होईपर्यंत मी शब्द धुडाळीत रहायचो.'—अन् नितीशबाबू त्या जुन्या आठवणीत गुरफटल्यामुळे मोठमोठ्याने हसू लागले. भानावर येऊन पुढे म्हणाले, 'आता मला तुमच मराठी थोडफार कळू लागलय्. उच्चारावरून साधारण अर्थ माझ्या लक्षात येऊ शकतो. बरेचसे सस्कृत शब्दही आहेत की तुमच्या भाषेत. मला कळतात ते. पण तुम्ही कसे ते intact ठेवले आहेत. अन् आम्ही बगाल्यानी ? We have broken up the original sanskrit words according to our own convinience.

'अपराजिता' लिहिण्याची कल्पना कशी सुचली ? या प्रश्नाच उत्तर देताना ते म्हणाले— तृप्तीबाई माझ्यामागे कधीच्या लागल्या होत्या. म्हणायच्या, मला solo Performanee द्यायची इच्छा आहे, पी. एल्. देशपाडे एकपात्री प्रयोग करतात ना, तसा ! मला काहीतरी लिहून द्या. मग मी विचार केला आपण लिहिल तर तृप्तीदी त्याचा उत्तम प्रकारे आविष्कार करतील यात शका नाही. मग मूळ कल्पना त्याचीच घेऊन मी ती साकार केली त्या सुमारास माझी आई कॅन्सरने आजारी होती. तिच्या जवळ बसल्या बसल्या मी अपराजिता लिहून काढल. तीन वर्षं झाली त्या गोष्टीला. आज तृप्तीबाईंनी अपराजिताचे दीडशेहून अधिक प्रयोग केले आहेत.

ह्या क्षणी सभाषणाची गाडी मी अपेक्षित स्टेशनवर आणली. म्हटल, अपराजिता मला अतिशय आवडल. आणि ते मराठीत आणाव अस प्रयोग पाहिल्यापासून सारख वाटत होत. अखेर तृप्तीबाईंना मी आपला मानस सांगितला. त्यानी छापील प्रत माझे हाती दिली नि आपणाकडे अगुलीनिर्देश केला. त्यामुळेच आज आपल्या परिचयाची सधी मला मिळाली, मग करू ना ह्याच मराठीकरण मी ?

अवश्य, अवश्य. करा नि झाल्यानतर मला कळवा. माझ्या कसल्याही अटी नाहीत. तृप्ती मित्र परदेशचा दौरा करून आल्यापासून तर तो प्रयोग अधिकच गाजला. आता इग्रजी अनुवाद होत आहे. गुजराथी व पजाबी अनुवादासाठी विचारणा केली आहे. आज तुम्ही मराठीसाठी विचारीत आहात. मला कल्पना आवडली. मराठी रगभूमी आणि मराठी माणसे यांच्याबद्दल माझ्या मनात अत्यत आदराची भावना आहे. तेंडूलकर, पी. एल. देशपाडे, श्री बा. जोशी फार मोठी माणसे आहेत.

नितीशबाबूनी मग अनेक अवांतर गप्पा केल्या, खूप काही काही गमती सागितल्या. लेखनाचा चटका लागला तेव्हा एका फॉरिन कपनीची लठ्ठ पगाराची नोकरी आठ वर्षांच्या सर्व्हिसनतर सोडून दिली म्हणाले.

मी आश्चर्याने विचारल, निव्वळ लेखनासाठी नोकरी सोडलीत ?'

'अहो काय सागू ! They were sucking my soul, you know, and I had no energy left for myself. पण नुसत्या लेखनावर पोट भरत नाही माणसाच. मी युनिव्हर्सिटीच्या रिसर्च विभागात लहानशी नोकरी करतो. आता मला माझा असा पुष्कळ वेळ मिळतो.

नितीशबाबूची बायको गणिताची प्रोफेसर आहे. तिची अगदी साधी, सरळ हसरी मूर्ती पाहून ही प्रोफेसर असेल हे खरसुद्धा वाटत नाही.

आता नितीशबाबू रगात आले होते. विचारू लागले तुम्ही व्हेजिटेरियन की नॉनव्हेजिटेरियन ? नतर म्हणाले, आम्ही नॉनव्हेज असूनही आमच्याकडे व्हेजिटेरियन प्रकारच फार आहेत. आम्ही mixed vegetables खातो तीन भाज्या असल्या तर त्याचे Permutations combinations होऊन नऊ भाज्या तयार होतात.

अन स्वत च्या स्टाईलमध्ये मोठमोठ्याने हसले त्याच्या बायकोला मी म्हटल, 'वा ! तुम्ही याना Permutations combinations शिकवून गणिताची दीक्षा दिलेली दिसतेय गणित अगदी ससारात आणून सोडलत !

ती हसली. मनापासून हसली. नितीशबाबूही हसले, अन मग मलाही हसू आल.

त्या हास्याच्या भरात असतानाच त्यांचा निरोप घेतला. फाटकापाशी येता येता ते म्हणाले,

तुमच ते श्रीखड, आम्हाला भारी आवडत बुवा ते ! 'मग या एकदा श्रीखड खायला. अवश्य या.' मी आमत्रण दिल.

तुम्ही आलात. खूप भालो लागलो म्हणाले. नमस्कार—प्रती नमस्कार झाले अन मी रस्ता चालू लागले. □ □

# साप्ताहिक भविष्य

**कृष्ण माईणकर**

**दि. ६ जुलै ७४ ते १२ जुलै ७४**

## महाराष्ट्र मंत्रिमंडळात अनपेक्षित बदल

महाराष्ट्राच्या धनूराशीला राहू व मंगळ या दोन ग्रहानी सध्या घेरले आहे. सत्तारूढ काँग्रेस पक्षाच्या वरवरच्या एकोप्यात ' कुठे-तरी धक्का बसण्याची शक्यता आहे. पंत-प्रधानांच्या ' सूचने 'चा वसंतराव नाईक यांना मनाविरुद्ध स्वीकार करावा लागेल. बॅ. अंतुले, यशवंतराव मोहिते, मधुकरराव चौधरी यांच्या नावाला महत्त्वाचे स्थान लाभण्याची शक्यता आहे. डॉ. रफिक झकेरिया केंद्रिय नेत्यांच्या ' अवकृपेचे ' धनी बनले तर आश्चर्य वाटू नये. मंत्रिमंडळातील एखाद्या महत्त्वाच्या संबंधीत बड्या उद्योग-पतीचा ' भ्रष्टाचार ' उघड होईल. राष्ट्र-पतीपदाच्या उमेदवार निवडीत विरोधकांची दुःस्थिती उघडी होईल. पुण्याच्या काँग्रेस पक्षात भाऊसाहेब शिरोळे यांचे महत्त्व पुन्हा वाढेल.

¤

**मेष** : तब्येतीत सुधारणा

एकटा गुरू जरी प्रतिकूल असला तरी तो महात्त्वाचा असल्याने त्याच्याकडे दुर्लक्ष करून चालणार नाही. विशेष करून टीका-त्मक लेखन करणाऱ्या वृत्तपत्रकारानी जरा जपूनच लेखणी चालवावी. सर्व साधारण हा आठवडा वाईट नाही. तब्येतीची जुनी दुखणी कमी होतील. तब्येत सुधारू लागले. उद्या मिथून राशीत रवी-बुध व रवी-शनी अशा दोन युत्या होत आहेत. त्यामुळे तुमचे सारे मनोरथ आता सफलतेचे वळण घेऊ लागतील. प्रामुख्याने व्यापार, शेती, इंजिनियरिंग स्वरुपाच्या उद्योगात नवे तंत्र चालू करायला हरकत नाही. **महिलांस** : तुम्ही भावनेच्या आहारी जाऊ नका. औद्योगिक कर्तृत्त्वाला विशाल क्षेत्र उपलब्ध होईल.

**वृषभ** : कलाक्षेत्रात उन्नती

तुमची वृत्ती ही रसिक व कलाक्षेक्षात रमणारी आहे. उद्या रवी-शनी आणि रवी–बुध युती तुमच्या धनस्थानी होत आहे. या-पासूनच तुमच्या व्यावसायीक जीवनाला कलाटणी मिळणार आहे. अनेक दिवस तुम्ही ज्या संधीची वाट पहात होता ती तुम्हाला सहज उपलब्ध होईल. सिनेमा, नाटक, रंग-भूमी, संगीत, चित्रकला इत्यादी कलाक्षेत्रातील कोणताही प्रकार असो त्यात यश व कीर्ती, अथवा प्रवेश मिळवण्याचे तुमचे स्वप्न साकार होणार आहे. एखाद्या धनिक व कलासक्त मित्राचे सहकार्य मिळेल. आर्थिक बाजू या आठवट्यात भक्कम राहील. **महिलांस** : लेखनाच्या क्षेत्रात तुम्हाला पहिल्या प्रसिद्धीचा आनंद मिळेल. नोकरीत यश.

**मिथून** : राजकीय मान

तुमची रास नेहमीच बौद्धिक क्षेत्रात पराक्रम व कर्तृत्त्व गाजवीत असते. आज बौद्धिक आघाडीवर, संशोधनाच्या क्षेत्रात व आर्थिक क्षेत्रात विशेष तेजाने चमकणारी जी माणसे चमकत आहेत त्यात मिथून रास अग्रभागी आहे. उद्या रवी-शनी व रवी-बुध युती होत आहे व तीही तुमच्या चंद्राजवळ. ही युती तुमच्या सुप्त राजकीय महत्त्वा-कांक्षेला चालना देईल. या वेळेपासूनच तुमची उपेक्षा संपून कर्तृत्त्वाचे ' मानाचे पान ' तुमच्या शिरपेचात खोवले जाणार आहे. अनेकांना मागे सारून तुम्हाला राज-कीय क्षेत्रात मोठा मान मिळेल. सोमवार ते गुरुवार नोंदून ठेवा. आर्थिक बाजू जेमतेम राहील. **महिलांस** : साडेसातीत जमवून घ्यावे लागते. तुमचाच हट्ट धरू नका.

**कर्क** : कसोटीचा काळ

दैव कधी कधी ' गंमत करीत ' असते. कधी तुमचे मनोगत पुरे करते तर कधी तुम्हाला हुलकावणी देते. सांप्रत तुम्ही साडे सातीच्या फेऱ्यात आहात व राशीत मंगळा-सारखा एक तामसी ग्रह येऊन बसला आहे. थोडक्या कारणावरून संतापणे, वैतागणे, निराश होणे, जीव नकोसा वाटणे असे काही तरी यावेळी घडत राहाणार आहे. शनिवार, सोमवार, मंगळवार व शुक्रवार कुलदेवतेची उपासना करा. चिंतन करा. रामनामाचा मनापासून जप करा. उद्या रवी, शनी व रवी, बुध अशा दोन युत्या तुमच्या व्यय-स्थानी होत आहेत. आर्थिक उलाढाल टाळा. पैशाचे मोठे व्यवहार करू नका. उसने पैसे मागू नका. नोकरीत काळजी घ्या. **महिलांस** : संताप व तापट स्वभावाचा तुमचा नेहमीचा ' गूण ' उचल खाणार नाही याची काळजी घ्या.

**सिंह** : शिलकीत वाढ

बाराव्या मंगळाने गांगरून जाऊ नका. रवी हा तुमच्या राशीचा स्वामी आहे व अंतरिक्षातील तो ' राजा ' आहे. तुम्हाला तो लाभस्थानी म्हणजे अकरावा आहे. तो तुमचे कधी अनहीत करणार नाही. या आठवड्यात म्हणजे अगदी उद्याच लाभस्थानी रवी-शनी व रवी-बुध युती होत आहे. या युतीपासूनच तुमचे आर्थिक जीवनमान उंचा-वेल. बुध हा व्यापारी ग्रह आहे. या वेळे-पासूनच तुमची पैशाची अडचण इतिहासजमा झालेली आहे याची खात्री बाळगा. रेसमध्ये वा लॉटरीरूपाने तुम्हाला एकदम पैसा मिळावा. मात्र तुमचे जन्मस्थ ग्रहमान जसे बलवान असेल तसेच तुम्हाला उत्तम फळ मिळेल. वारसदारीचा वा इस्टेटीचा दावा जर चालू असेल तर तुमचा लाभ होईल. प्रकृतीला जपावयास हवे. **महिलांस** : तब्ये-तीची कुरकूर चालूच राहील. मात्र आर्थिक स्थिती सुधारेल.

**कन्या : नोकरीत अनुकूलता**

या आठवड्याची सुरुवात एखादी शुभ-वार्ता व मंगल कार्याने होईल. चंद्र संपूर्ण आठवडा उत्तम आहे. रवी-बुध व रवी-शनी अशा दोन युत्या मिथून या बौद्धिक राशीत होत आहेत. नोकरी, उद्योग, दुय्यम व्यवसाय वाङ्मयनिर्मिती, प्रवास, राजकारण इत्यादी सर्व क्षेत्रात तुमचे मनोरथ पुरे होऊ लागतील. तुमच्या अतृप्त महत्त्वाकांक्षा व अपुरी राहिलेली स्वप्ने आता पुरी होऊ लागतील. नोकरीत तुमच्यावर होत असलेल्या अन्यायाची वरिष्ठाना जाणीव होईल. ते तुमच्याबद्दल सहानुभूतीने विचार करू लागतील. बेकारांच्या बाबतीत सहानुभूती व आर्थिक सहाय्य मिळू शकेल. तेलबिया वा कापड विक्री असा दुय्यम व्यवसाय सुरू करा. **महिलांस** : मन.स्वास्थ्य उपासनेने मिळवा. नोकरीत अनुकूल वातावरण राहील.

**तूळ : भाग्यरथाला वेग**

चंद्रावर हर्शल तर पंचमस्थानी गुरू, दशमस्थानी मंगळासारखा अतिशय बलवान ग्रह आहे. भाग्यस्थानी रवी-बुध व रवी-शनी युती उद्या होत आहे. याच युतीपासून तुमचे आर्थिक व व्यावसायिक जीवन वेगाने प्रगती-कडे जाऊ लागेल. भाग्यरथाची घोडदौड वेगाने सुरू होईल. तुमच्या अवतीभवती असलेली अडचणींची दरी बुजली जाईल. तुम्ही ती पार करून जाऊ शकाल. नोकरी व व्यवसाय याबाबतीत तुमच्यासमोरची सारी प्रश्न चिन्हे मिटू लागतील. पैसा नको नको म्हणता हवा तेवढा मिळेल. रेसमध्ये मिळेल. तुम्ही कलावंत म्हणून चमकाल. चैनीची राहाणी वाट्याला येईल. सोमवार हा महत्त्वाचा ठरेल. **महिलांस** : कुमारिकांचा प्रेम विवाह होण्याचा जबरदस्त योग आहे. संसारात गंमत येईल.

**वृश्चिक : अंधार संपला**

मला कळवायला आनंद वाटतो की मित्र हो, या आठवड्यापासून तुमच्या दुःखमय, निराशमय परिस्थितीला आशेची रूपेरी कडा दिसू लागेल. तुम्ही सोसलेल्या यातना वा तुमच्या मनाला होत असलेल्या जखमा मी समजू शकतो. पण दैवाच्या करणीपुढे काही इलाज नसतो. सुखस्थानी सध्या गुरु तसा उत्तम आहे. तो तुमचा जागेचा प्रश्न सोड-वील. पण मन सतत व्यग्र ठेवील. कसली-तरी सुप्त-अज्ञात भीती तुम्हाला सतावीत राहील. रोज दत्ताचे दर्शन घेत जा. पैसा तसा कमी मिळणार नाही. पण आडमार्गाने तो मिळवण्याचा प्रयत्न करू नका. व्यसनाचा मोह व अनितीची ओढ ही यावेळेची दोन संकटे आहेत. संयम ठेवा व विवेक शक्ती जागी ठेवा. **महिलांस** · शेजारी व विरोधक यापासून त्रास होईल. पण संयम ठेवा.

**धनू : बेफिकीर राहू नका**

धनू राशीच्या लोकाना सध्याचा काळ सर्वच बाजूनी कसोटीचा जात आहे याची मला जाणीव आहे. पण रावणासारख्या महाप्रतापी पुरुषालादेखील ग्रहांच्या दृष्टीतून सुटता आले नाही तेथे माणसाची काय कथा ? पण हा प्रतिकूल काळ फारच थोडा असतो. तेवढी कळ सोसली तर प्रसन्नतेची झुळक लागून पुन्हा जीवन ताजेतवाने होईल. सध्याचा काळ जरी कसोटीचा असला तरी तुम्ही त्यावर सावधगिरीने व बेफिकीरी सोडून मात करू शकाल. प्रामुख्याने राहू बारावा आहे. सरळ चाललेल्या नोकरी व्यव-सायात काही तरी अकस्मात अडचणी निर्माण होणारच नाहीत असे नाही. वरिष्ठांच्या मनात गैरसमज होऊ शकतील. एखादवेळी बेकारीसारखी आपत्तीदेखील कोसळू पाहील. रोज गणपतीदर्शन घ्या. पैसा मिळेल व खर्च होईल. **महिलांस** : अहंकारी वागणूक सोडणे आवश्यक होईल. नोकरी-धंदा आहे त्याच परिस्थितीत राहील.

**मकर : संसारात त्रास**

मिथून राशीत रवी-बुध व रवी-शनी युती उद्याच होत आहे तुमचे शत्रू, विरोधक तुमच्यापुढे निःष्प्रभ होतील. तुमच्या कल्पक बुद्धीमत्तेने अनेक जण या आठवड्यात थक्क होऊन जातील. तुम्ही जर राजकारणात सत्ते-वर असाल तर रविवार ते बुधवार या काळात तुमच्या हातून महत्त्वाचे काम होऊन तुमचा दरारा निर्माण होईल. हाताखालची कार-स्थानी माणसे तुम्हाला वचकून वागू लाग-तील. नोकर व हाताखालचे लोक तुम्हाला मान देऊ लागतील. असे असले तरी वैयक्तिक जीवनात मात्र असावे तेवढे सुख तुम्हाला मिळणार नाही. तुमच्या महत्त्वा-कांक्षा उधळतात की काय अशी परिस्थिती निर्माण होईल. पैसा आणि श्रम वाया जातील. संसारात त्रास व थोडी कटुता निर्माण होऊ पाहील. **महिलांस** : पतिराजाचे ऐका. गैरसमज वाढवू नका. त्यांच्या मनाचा कल जाणून घ्या.

**कुंभ : उच्चपदाची शक्यता**

तुमच्या राशीतच गुरूसारखा एक सात्त्विक तेजाचा ग्रह आहे. तर भाग्य-स्थानच्या तूळ राशीत हर्शल विराजमान झाला. गुरू-हर्शलचा हा असामान्य असा त्रिकोणयोग तुमच्या जीवनात अद्भुत व आश्चर्यकारक घटना घडवून आणणार आहे. राजकारणात महत्त्वाचे स्थान, शासनात अगर सत्तेत उच्च पद, सार्वजनिक कार्यात मानसन्मान, तुम्ही लेखक अगर संशोधक असाल तर तुमच्या कल्पनेचा गौरव असे काही ना काही घडेल. तुमचे हे ग्रहमान तुम्हाला या आठवड्यात सतत प्रकाशझोतात ठेवणार आहे. नोकरीची परिस्थिती सुधार-णार असून आगामी काळ स्वास्थ्याचा जाईल असे काही तरी नोकरीत घडेल. व्यवसायात, व्यापारात प्रगती. **महिलांस** : नुकतेच सुरू झालेले नवे संसार प्रसन्नतेच्या: वातावरणाने फुलतील. एखादी सहल घडेल.

**मीन : मंगळाचे वरदान**

सुखस्थानी रवी, शनी, बुध यांच्या झालेल्या युत्या तुमचे मन.स्वास्थ्य जरी हेलकावत ठेवणार असल्या तरी त्यामुळे तुम्ही 'चिंतातूर' व्हावे असे काहीच घडणार नाही. उलट राहाण्याच्या जागेचा, स्थावर मिळकतीचा प्रश्न अनुकूल वळण घेऊन मार्गी लागेल. परिस्थितीप्रमाणे बंगल्यात राहायची इच्छा पुरी होऊ शकेल. या वेळी तुमच्यावर खरी कृपा केली आहे ती मंगळाने. मंगळाची कृपा म्हणजे वर-दानच. खाणमालक, खाणीत काम करणारे नोकर, बागायतदार, जमिनीचा व्यवहार करणारे दलाल, शेतकरी, प्लॅस्टिक व अल्युमिनियमचे उद्योगवाले या सर्वांचे भवितव्य उत्तम तऱ्हेने हा मंगळ घडवील. उच्च पदे, नोकरीत खास प्रमोशने मिळतील. परदेशी प्रवासाचा योग. **महिलांस** : नोकरीत उच्च पद मिळेल. अधिकारपदाच्या निमित्ताने परदेश दौरा. ☐ ☐

# ‘ गीत संपायण ’

अशोक जैन

हिंदी चित्रपट हे खरे विचित्रपट. ‘ रविवारचा पदार्थ ’ असावा तसा या (वि) चित्रपटाचा फॉर्म्युला रेडिमेड. एक चटपटीत हिरो घ्यावा, जोडीला चटकचादणी हिरॉईन घ्यावी, धागर्डधिंग्याची फोडणी द्यावी, थोडा व्हिलन किसून (इग्रजी अर्थ नव्हे) घालावा, गाण्याची मीठ मिरची घालावी व शेवटी प्रेमाच्या तुपात हा पदार्थ घोळ-घोळ-घोळावा आणि मग खुशाल हजारोना तो पाहूला वाढावा, अशी (बे)चवदार कृती. विषय कोठलाही असो कृती हीच त्यामुळे रेल्वे सपावर हिंदीवाल्यानी नाना चित्रपट काढले तरी फॉर्म्युला तोच.

## संपूर्ण संप रामायण

होमी वाडियाने ‘ सपूर्ण सप रामायण ’ हा चित्रपट काढला. त्यात रेल्वे सप झाल्याने प्रभू रामचद्राना १२ वर्षे वनवासात काढावी लागली असा रामायणावर नवा प्रकाश होता. (या चित्रपटावर ‘ सप कच्चा, वनवास बरा ’ अशी परीक्षणेही छापून आली ! ) प्रभू रामचद्र श्रीलकेस रेल्वेने निघाले असता वाटेत सप झाला तरीही सेतू बाधून प्रभू गेले असेही यात दाखविले होते ! ‘ रेल हडताल का नही भय, बोलो सियावर रामचद्र की जय ’ हे या चित्रपटातले भक्तीगीत अत्यत गाजले.

‘लव इन रेल का डिब्बा ’ हा इशारा यानी काढलेला चित्रपट केवळ प्रौढांसाठी होता. ‘ हम और तुम इक रेलके डिब्बेमें बद हो जाय, और मजदूरोका हडताल हो जाय ’ यातले हे गाणे घरोघर आळवले जाऊ लागले. नायक-नायिका रेल्वेच्या डब्यात भेटतात. पुढे सप होतो. हे डब्यात अडकून पडतात. तेथेच त्याचे लग्न होते. व ससार सुरू होतो. सपामुळे दोघे प्रेमीजीव एकत्र आले असा या चित्रपटाचा सदेश (फक्त प्रौढांसाठी होता.

## याऽऽऽहूऽऽऽ

‘ रेल और खेल ’ या चित्रपटात रेल्वेमत्र्याचे पात्र दाखवले होते त्याच्या तोडी ‘ याऽऽऽहू , चाहे कोई रेल हडताल करे, करता है तो करता रहे, हम तो गाडी चलाते है, चलाते है ’ हे गाण होतं. या चित्रपटात प्रेमाचा नुसता खेळच खेळ होता. त्या मानाने रेल कमी. (तेव्हा या चित्रपटाच परीक्षण खेळ पुष्कळ, रेल्वे कमी असं छापून आलं ! ) हा चित्रपट ज्याला कळेल त्यासाठी पारितोषिक स्पर्धा लावण्यात आली. शेवटी पहिली तीन बक्षिस कोणालाच देता आली नाहीत.

‘जोहर–मेहमूद इन रेल्वे बोर्ड ’ हा चित्रपट धमाल चालला. त्यात रेल्वे सपामुळे रुळावर जाऊन आत्महत्त्या करणाऱ्याची किती पचाईत झाली याचे चित्रण होते. रेल्वे बोर्डात जाऊन जोहर–मेहमूद जोरदार गोधळ घालतात. रेल्वे चालू नसूनही सारीकडे सुरळीत चालू आहे अशी फेकाफेक ते करतात. (जनतेला यात काहीच नावित्य वाटल नाही) गमत म्हणजे खरोखरच सप मागे घेतला जाऊन गाड्या चालू होतात तेव्हा रेल्वे बोर्ड उलट बातम्या देण्याची सवय असल्याने ‘ गाड्या चालू नाहीत ’ अशा बातम्या देई असे या चित्रपटात दाखवले होते.

## संपसंध्या

नव चित्रपटाची लाट हिंदीतही आली आहे. त्याचही लक्ष रेल्वे सपाकडे वळले. ‘ सपसध्या ’ या गोजिरवाण्या नावाच्या चित्रपटात कोठेही रेल्वे दाखविली नव्हती. नायक व नायिका याचे रेल्वेने प्रवास करण्याचे स्वप्न असते. मला रेल्वेत बसायचय असं दोघं एकमेकाना म्हणत असतात. पण त्याची ही इच्छा कधीच पूर्ण होत नाही अशी ही ट्रॅजेडी होती ! यात रेल्वे ही नियतीच प्रतीक असून तिने नायक-नायिकांच्या भावनाच्या वर्तुळास आतरिक छेद दिलाय ’ अस परीक्षण छापून आल ! दुसरा एक नव चित्रपट फार सथ होता. कारण, बोरीबदरहून सुटलेली लोकल मसजिद स्टेशनपर्यंत येते हे त्यानी वास्तववादी दाखववयाचे ठरवले तेव्हा चित्रपटाचा दीड तास सपला तरी लोकल दोन स्टेशनामध्येच होती.

कोणीच धड पूर्ण लाबीचा खराखुरा चित्रपट काढीत नाही असे सरकारला वाटले म्हणून रेल्वे सप या विषयावर आकाशवाणीला चित्रपट काढावयास सागण्यात आले. कारण ‘ जे न देखे रवी ते देखे आकाशवाणी ! ’ अशी रेल्वे सपाच्यावेळी स्थिती होती. त्यामुळे ‘ आकाश्वानीने ’ सुदर चित्रपट काढला. त्यात भारत बद कसा असफल झाला हे दाखवताना बद असला तरी पक्षी गात होते, नद्या वाहत होत्या, सूर्य नेहमीप्रमाणेच पूर्वेस उगवला होता हे सार दाखवून बद वाल्याचा पार धुव्वा उडवला होता. या चित्रपटास भारत सरकारचं राष्ट्रीय पारितोषिक मिळाल.

## रेल्वेचं इंजान बसवा


हिंदी वाल्याच हे सपप्रेम बघून मराठी चित्रपटवाले थोडेच गप्प बसणार ? दादा कोडके यानी ‘ हात लावीन तेथे सप ’ हा धमाल चित्रपट काढला. तर दुसऱ्या एका निर्मात्यान ‘ सपाची सय ’ हा तमाशापट काढला. त्यात रेल्वे सपान डब्यातच अडकून पडलेली तमाशातली बया म्हणते, ‘ राया माझ्या गाडीला रेल्वेच इजान बसवा ’ या चित्रपटात रेल्वेच्या डब्यात तमाशाचा प्रयोग होतो. मग धमाल मारामारी व शेवटी मीलन असा प्रकार होता.

आणखी एका मराठी निर्मात्याच चित्रपटाच सार बजेट रेल्वे डब्याचा सेट उभारण्यातच खर्च झाल त्यामुळं चित्रपट अपुराच राहिला. अखेरीस चित्रपटाच्या गीतकारांनी ‘ गीत सपायण ’ लिहिल. ‘ स्वये पतप्रधान ऐकिती फर्नांडिस–दडवते गीत सपायण गाती ’ यातल्या या भावपूर्ण गीतान महाराष्ट्रास वेड लागायची पाळी आली ! मात्र ‘ गीत संपायण ’ एवढ लोकप्रिय झाल की रेल्वे कामगाराच्या मदतीसाठी त्याचे अनेक प्रयोग झाले. त्या उत्पन्नातून रेल्वे कामगाराच्या वेतनवाढ, बोनस या मागण्याचा प्रश्न सुटला.

□ □

एरवी मी देवीवर रागावलो असतो, पण, त्या दिवशी रागावलो नाही...!
एका पार्टीमध्ये देवी तनुविषयी काहीतरी बोलत होती. तिचे आणि तनुचे काहीतरी भांडण झाले हे मी ऐकले होते. देवी म्हणाली, ' या अखबारवाल्यांनी तनुजाला चांगली ॲक्ट्रेस–चांगली ॲक्ट्रेस म्हणून चढवून ठेवली आहे ! '
काय तनुजा चांगली ॲक्ट्रेस नाही ?
मला तनुजाविषयी वाईट वाटले ! एकदा देवीने तनुजाविषयी ' इनक्रेडिबल तनु ' वगैरे खूप कौतुक केले होते. तीच देवी आता तनुला मानायला तयार नव्हती. आणि तनुबद्दल देवीने असं म्हटल्यानंतर मी एरवी देवीवर वैतागलो असतो. पण मीही गप्प राहिलो. तनुविषयी मात्र मला मनातल्या मनात खूपच वाईट वाटत होते–खूप वाईट वाटत होते.
परवा एन्. भारतीने (फ्री प्रेस बुलेटिन) तनुविषयी असाच एक आयटेम लिहिला होता. रामानंद सागर मंडळींमध्ये एका काळी तनु सर्वांची आवडती होती म्हणे. आता त्याच रामानंद सागर कँपमध्ये तनुविषयी वाईट बोलले जाते.
तनुविषयी सगळ्यांची मनं बदलल्यासारखी वाटतात. बंडखोर तनु, चंट तनु, ग्रेट तनु, बुद्धिमान तनु, अशी एक तनु होती आणि आता भांडखोर तनु, अक्कलशून्य तनु, चढवलेली तनु अशी एक तनु आहे. या ट्रान्सफर सीनमध्ये फक्त दोन वर्षांचा काळ लोटला असावा. ज्या दोन वर्षात तनुचे शोमु मुखर्जी या असामीशी लग्न झाले. त्यानंतर ती एकदा नासावली आणि पुन्हा गर्भार असून, लवकरच बाळंत होईल.
सुमारे पंधरा-एक वर्षांपूर्वी ' छबिली ' या चित्रापासून तनुजाचे कौतुक करणारे आम्ही दोन वर्षांच्या अल्प कालावधीमध्ये तिचे टीकाखोर बनलो. आम्हाला ती आवडेनाशी झाली. आम्हीच तिच्याविषयी किती चांगले बोलत होतो हे विसरून गेलो. मला आठवतं, आम्ही मराठी अखबारवाले तिचा ' गुस्ताखी माफ ' हा चित्रपट पाहिल्यानंतर ओव्हल मैदानातून चाललो होतो. त्या चित्रपटातल्या तनुजाच्या भूमिकेवर आम्ही सारेच जण खूश होतो. जो तो आपण आपल्या परीक्षणात तनुजाला काय हेडलाईन देणार ते सांगत होता. आमच्यात स्पर्धाच निर्माण झाली होती. मी ती स्पर्धा जिंकली. स्वर्गवासी आचार्य अत्रे स्टाईलने मी हेडलाईन दिली होती, ' दहा हजार वर्षात अशी नटी झाली नाही ! '
मी ' गुस्तखी माफ ' विसरू शकत नाही. ' जुएल थीफ ', पैसा या प्यार ' या त्यावेळच्या चित्रपटामधली तिची कामे मी विसरू शकत नाही. तो जमाना आठवला की असं वाटायचं तनुजा एक हिंदी पडद्यावरचं ' हॅपनिंग ' आहे. ज्या ' हॅपनिंग ' साठी आमचं मन आसुसलेलं होतं. त्या काळात नूतन, माला सिन्हा, वैजयंतीमाला, वहिदा रेहमान (तिच्या इंटलेक्चुअलिझम सह) आशा पारेख, नंदा या नटचा म्हणजे पडद्यावरच्या एक एक देवी असत. त्यांच्या भूमिका बहुतेक आमच्यासारख्या पब्लिक ऐवजी, मॅटिनीला

## तनुच का ?





मॅनली विनोद खन्नाबरोबर काम करायला तिला आवडते. 'इम्तिहान'मध्ये विनोदबरोबरच.

रडण्यासाठी जाणाऱ्या वायकांसाठी असत. एक 'तनुजा' अशी अभिनेत्री होती जी आमच्यासाठी भूमिका करीत होती. आमच्यासाठी जगत होती. ती स्विम ड्रेसमध्ये छायाचित्रे देत होती. ती अजूनही आम्ही सांभाळली आहेत. यशवंतरावांना 'तुम्ही काय करता हो' म्हणून सवाल विचारणारी तनु, सेटवर नटचा पहाण्यासाठी आलेल्या पोरींना, सिगारेट पिऊन दाखवणारी आणि आपण दारुही पितो म्हणून धक्का देणारी तनु, एका अंग्रेजी अखबारच्या मुलाखत्याला आपण, 'हाथी, मेरे साथी' या चित्रात काम केल्याबद्दल मुळीच वाईट वाटत नाही म्हणून सांगणारी तनु, प्रेस शो ला कुठचासा बकवास पेहेराव करून येऊन बनी रुबेनला, 'माझा पेहेराव कसा काय वाटतो ?' म्हणून सवाल, करणारी तनु, आपण काही बुकं-बिकं वाचत नाही बुवा' म्हणून आपले इंटलेक्चुअल इमेज फोडणारी तनु, आपण दादामुनी पेक्षा अधिक शराब पितो अशी फुशारकी मारणारी आणि तोंडामध्ये वेछूट भाषा असणारी, मुंबईपेक्षा कलकत्ता पसंत करणारी तनु, या तनुच्या इमेजमध्ये आम्हाला रोमँटिक इंटरेस्ट होता. (ती सेक्सी दिसत नसे तरी–) तनु छबिली झाली, जुएल थिफनंतर तिचे टॉम-बॉईश इमेज सिनेमावाल्यांना दिसले आणि मग तिला कामं मिळेनात तेव्हा ती बंगालमध्ये गेली. बंगाली चित्रपटसृष्टीतही तिने आघाडीच्या अभिनेत्रीमध्ये स्थान मिळवले, त्यानंतर मुंबईला 'हाथी मेरे साथी'च्या कामयाबीनंतर मुंबईच्या फिल्म इंडस्ट्रीत ती स्थिर झाली. तिला कामे मिळू लागली; 'दो चोर'चे दिग्दर्शक पद्मनाथ मला सांगत होते की, तनु म्हणत होती की 'दो चोर' चालला की ४ लाख पेक्षा कमी घेणार नाही. इतक्यात तिचे लग्न झाले. तिचे लग्न होणार याची कल्पना हळूहळू आम्हाला येऊ लागली होती. तिचा मुखर्जी-कुटुंबामध्ये काहीतरी रोमँटिक इंटरेस्ट आहे, हे आम्हाला कळले होते. तो कुणाशी हे मात्र आम्हाला समजले नव्हते. 'इक बार मुस्करा दो'चे संगीतकार ओ. पी. नय्यर यांनीच आम्हाला तिचे नी शोमूचे प्रेमप्रकरण चालू असल्याचे सांगितले. आमच्या कानावर देबुचे नाव येत होते. काही असले तरी तनुजासारखी मुलगी कुणातरी शोमुमध्ये किती इंटरेस्ट घेणार, असाही एक भरंवसा वाटत होता. पण अखेर तिचे शोमुशीच लग्न झाले. आम्हाला मुखर्जी आणि त्यांच्या फिल्मा, यांच्याविषयी एरवीच अॅलर्जी आहे. साहाजिकच तनुने त्या घरात प्रवेश करणे हे आपल्या मनास आले नव्हते. पण, तनुच्या लग्नाविषयी बरे वाईट बोलणारे आपण कोण आहोत ?

एकूण लग्न झाल्यापासून तनुजा बदलली होती. लग्न झाल्यानंतर माणसे बदलतात हे खरे, पण एवढे ?

आपल्यालाही आता तनुविषयी काही उत्सुकता राहिली नाही. एका मराठी प्रकाशकाचे प्रपोझल होते 'तनुजा' विषयी



तनूजा–देबू
इक बार मुस्करा दो
म्हणणाऱ्या मुखर्जी
कँपमध्ये- ती
अशी सामील झाली.

लिहिता काय ? आता तिच्या विषयी नंदू राजेही लिहिणार नाही.
तरी सुद्धा तनुच्या अभिनयाचा आपल्याला भरवसा वाटतो. आता तिला आपण ' हमशकल ' ' इम्तेहान 'मध्ये पाहालं ' सॅल्युट ! ' तिच्याशी आपली मारामारी तरी आपण तिला ' ग्रेट आर्टिस्ट ' मानतोच.
काय गंमत आहे पहा, तिची बहीण नूतन, तिची पण हीच तऱ्हा. ग्रेट आर्टिस्ट ! पण लग्न झालं नी एकदम आमच्या मनातून उतरली. तिच्याही लग्नाविषयी आम्हाला अशीच ॲलर्जी होती. पण एक दिवस ती ' अनुराग 'मध्ये पुन्हा छोटयाशा भूमिकेत आली नी आपण तिला मानले. न जाणो तनुच्या बाबतीतही असंच घडेल. ती ही परत येईल !

काही असो ! तनुविषयी कोणी काही बोलू लागले म्हणजे माझ्या मनाला फारच लागते. एकदा तिच्याकडून एका माणसाला मोटार अपघात झाला होता. नी त्यावेळेस, ती कमालीची दुःखी होऊन म्हणाली होती, ' हा अपघात माझ्याकडूनच का व्हायला हवा होता ? ' आजही तनुविषयी वेडेवाकडे लोक बोलू लागले की विषादाने म्हणावंसं वाटते, ' त्यांच्या तोंडी तनच का ? ' ¤

## अंकूर

ब्लेझ ॲडव्हरटायझिंग कंपनीने कधी कधी जाहिरात पट काढले आहेत. त्यांचे काही पोलाद कारखान्यावरील अनबोधपटही आहेत. चांगले होते ते.

त्या कंपनीने ' अंकूर ' हा चित्रपट काढला आहे. पोलाद कारखान्यावरील अनुबोधपटांचे दिग्दर्शक श्याम बेनेगल हेच त्याचे दिग्दर्शक आहेत.
गाणी नाहीत; एक लहानशी कथा, शबाना आझमी (कैफी आझमी यांची कन्या) अनंत नाग, साधु मेहेर, प्रिया तेंडुलकर (विजयरावांची कन्या) ही नवी माणसे. (शबाना आणि साधु मेहेर यांनी अर्थात यापूर्वी कॅमेरा फेस केला आहे) गोष्ट आंध्रप्रदेशाच्या जानपदातील. अर्थात ही कथा पेश करताना शाम बेनेगल हे ' नवे ' दिग्दर्शक असले तरी ' जंप कट्स ' वगैरे मारीत नाही. कॅमेराही रिपीट करतात याचं आश्चर्य वाटतं. त्यामुळे गती फारच संथावली आहे. वाटतं हे चित्र कुठे जाईल ? पण, इंटरव्हलनंतर हे चित्र विलक्षण चढतं.

MANOOS ( Weekly ) : 100 Paise : Regd. No. PNC-68



'मेरी किस्ती 'मध्ये साजिद–योगिता

साधु मेहेर आणि शबाना आझमी यांची कामं तर अप्रतीम झालीच आहेत पणं त्यांचं जे सोसणं आहे, त्यात भारतातल्या खेडयापाडयातल्या गोरगरीबांची असहाय्यता दिसून येते. आणि आपल्याला भिडते.

'इव्हनिंग न्युज़चे बिझी-बी एरवी नवचित्रपटांची टिंगल करतात परंतु, या चित्रपटाचे त्यांनी कौतुक केले. ही गोष्ट या संदर्भात लक्षात घेण्यासारखी आहे. कदाचित आपल्याला 'नव-चित्रपट ' म्हणून 'अंकूर 'सारखा चित्रपट देण्यामध्ये काहीतरी 'अचिव्ह ' करता येईल; कुणास ठाऊक ?

## सिमीकी शादी

परवा सकाळचा अखबार हातात पडला नी आमच्या सियानी सिमीने शादी केल्याची बातमी वाचून चमकलो. एका अर्थाने ही शादी करण्यात सिमी सियानी ठरली. उद्योगपती मिळवला. तोही फिल्म-वर्ल्डवर आपली 'न्यूड पोझ ' दिल्यानंतर...! आश्चर्य होतं. आश्चर्य आणखी हे होतं की सिमीने आपल्या शादीची कुणालाही खबर लागू दिली नाही. कुठेही गॉसिप नाही हे कसं काय ?–माझी एक खात्री आहे. अट्टल जुवारी ज्याप्रमाणे तीन एक्के आपल्या हातात ठेवतो त्याप्रमाणे सिमीने ह्या उद्योगपती आपल्या हातात ठेवला असावा. नाहीतरी 'न्युड पोझ 'चा जो सिलसिला झाला नी त्यामुळे सिमीच्या इमेजला जो ढव्वा बसला त्यामुळे ती आपले फिल्म इंडस्ट्रीमध्ये भवितव्य काय आहे हे समजून चुकली असावी. बिचारी शादी करायला मजबूर झाली होती. □

राजहंस प्रकाशन संस्थेच्या मालकीचे हे साप्ताहिक संस्थेतर्फे मुद्रक व प्रकाशक श्री. ग. माजगावकर यांनी साप्ताहिक मुद्रण १०२५ सदाशिव पेठ, पुणे ३० येथे छापून १०२५ सदाशिव पेठ, पुणे येथील संस्थेच्या कार्यालयात प्रसिद्ध केले. सं. श्री. ग. माजगावकर